


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २२७ ■ मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## 'त्या' स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर!

**मुंबई :** आरक्षणाची ५० टक्केची मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाकडून मनाई करण्यात आली आहे. राज्य सरकारने न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणुका घेऊन देण्याची विनंती केली होती, मात्र ही मर्यादा ओलांडलेल्या २२ जिल्हा जिल्हा परिषद तसेच पंचायत समितींच्या निवडणुका घेण्यास सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने स्पष्ट शब्दात नकार दिला आहे. या निकालामुळे उर्वरीत जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका लांबणीवर पडल्याचे स्पष्ट झाले आहे.

# 'फाईल हलते पैशाने, मंत्रालय चालते हप्त्याने'



## विरोधकांकडून झिरवळांच्या राजीनाम्याची मागणी



प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**मुंबई :** राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आज दुसरा दिवस आहे. यादरम्यान अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मंत्रालयातील दालनात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईचे पडसाद आज विधानभवनात उमटले. विरोधकांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर मंत्रालयातील लाचखोरी प्रकरणाविरोधात जोरदार आंदोलन केलं. यावेळी विरोधकांकडून झिरवाळ यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, आमदार सतेज पाटील आणि इतर प्रमुख नेत्यांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर ठिय्या मांडत आंदोलन केले. यावेळी 'फाईल हलते पैशाने, मंत्रालय चालते हप्त्याने', 'मंत्रालयात एकच हिरवळ, यांचं नाव झिरवळ झिरवळ', 'भ्रष्टाचारी मंत्र्याला पाठीशी घालणाऱ्या सरकारचा धिक्कार असो', 'मंत्रालयात लक्ष्मीदर्शन, झिरवळ राजीनामा द्या', अशी विरोधकांनी घोषणाबाजी केली. यावेळी विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना सरकारवर टीका केली. 'राज्याचा कारभार हाकणाऱ्या मंत्रालयाच्या इमारतीत जर मंत्र्यांच्या डोळ्यादेखत लाच घेतली जात असेल, तर हे सरकार भ्रष्टाचारात किती बुडाले आहे हे स्पष्ट होते. मंत्र्यांच्या आशीर्वादाशिवाय खालचा कर्मचारी एवढे धाडस करू शकत नाही. त्यामुळे नैतिक जबाबदारी स्वीकारून नरहरी झिरवाळ यांनी तात्काळ राजीनामा द्यावा,' अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. मंत्रालयातील पाचव्या मजल्यावरील अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कार्यालयात काही दिवसांपूर्वी भ्रष्टाचाराची घटना समोर आली. एका प्रलंबित फाईलच्या मंजुरीसाठी एका लिपिकाला लाच स्वीकारताना एसीबीने (ACB) रंगेहाथ पकडले. मंत्र्यांच्या दालनापर्यंत भ्रष्टाचाराचे धागेदोरे पोहोचल्याने विरोधकांनी सरकारची कोंडी करण्यास सुरुवात केली आहे

### काँग्रेस आमदाराला बिश्नोई गँगकडून मिळालेल्या धमकीचाही केला उल्लेख

विजय वडेट्टीवार यांनी यावेळी अकोला पश्चिमचे काँग्रेस आमदार साजिद खान पठाण यांना बिश्नोई गँगने दिलेल्या धमकीचा मुद्दाही यावेळी उपस्थित केला. ते म्हणाले, १७ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० वाजता आमदार साजिद खान पठाण यांना एक आंतरराष्ट्रीय कॉल आला. बिश्नोई गँगशी सबंधित शुभम लोणकर याने फोन करून आमदारांकडे १० कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केली आणि पैसे न दिल्यास गोळया घालून ठार मारण्याची धमकी दिली. धमकी देणाऱ्याने अत्यंत उद्दामपणे म्हटले की, पोलिसांना सांगितले तर ते महिना-दोन महिने संरक्षण देतील, पण सहा महिन्यांनी किंवा वर्षाने आम्ही तुला सोडणार नाही, मारल्याशिवाय राहणार नाही. वडेट्टीवार म्हणाले, राज्यात लोकप्रतिनिधीच सुरक्षित नसतील, तर सामान्य जनतेचे काय? ज्या गँगने यापूर्वी गोळीबाराच्या घटना घडवून आणल्या आहेत, त्यांच्याकडून धमकी येणे ही अतिशय गंभीर बाब आहे. धमकीचा ऑडिओ ऐकला तर अंगावर काटा येतो. साजिद पठाण यांचा कोणत्याही गुन्हेगारी क्षेत्राशी संबंध नाही, तरीही त्यांना लक्ष्य केले जात आहे. काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी मांडलेल्या या मुद्द्याची गांभीर्याने दखल घेत विधानसभा अध्यक्षांनी सरकारला निर्देश दिले की, हा विषय अत्यंत गंभीर आहे. शासनाने तात्काळ या प्रकरणाकडे लक्ष देऊन संबंधित आमदारांच्या सुरक्षेबाबत योग्य ती पावले उचलावीत.

### अवकाळी पाऊस, गारपीटग्रस्त शेतकरी संकटात

काँग्रेस विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत अवकाळी पावसामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीची मदत करण्याच्या मुद्यावरून सरकारला चांगलेच कोंडीत पकडले. त्यांनी या शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याची मागणी करत धान उत्पादक शेतकऱ्यांना अद्याप बोनस मिळाला नसल्याकडेही सरकारचे लक्ष वेधले. त्यांच्या मदतीला भाजप आमदार तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवारही धावून आले. विदर्भ आणि मराठवाड्यातील नुकसानीचा पाढा वाचताना वडेट्टीवार म्हणाले की नागपूर, भंडारा, गोंदिया, यवतमाळ तसेच मराठवाड्यातील बीड, लातूर, नांदेड, परभणी भागात वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपिटीने ज्वारी, गहू, हरभरा ही काढणीला आलेली पिके मातीमोल झाली आहेत. आंबा आणि द्राक्ष बागायतदारांचेही अतोनात नुकसान झाले आहे. हवामान खात्याने सोलापूर, परभणी, नांदेड, धाराशीव भागात पुढील दोन दिवस पावसाचा इशारा दिला असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. मागील अतिवृष्टीची मदत अजून मिळालेली नाही, धानाला बोनस जाहीर करून देण्यात आलेला नाही आणि आता पुन्हा संकट आले आहे. सरकारने नियम-निकष बाजूला ठेवून तातडीने रोख मदत द्यावी आणि पंचनाम्यांचे केवळ आदेश न देता प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

# जिल्ह्यात भाजपचा ग्राफ घसरला

## प्रदेश सरचिटणीस पदावरुन रणधीर सावरकरांना हटविले!



प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अकोला:** अकोल्यातील भारतीय जनता पार्टीच्या स्थानिक नेतृत्वावर सातत्यपूर्ण ढिसाळ कामगिरीमुळे मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. लोकसभा निवडणूक २०२४, विधानसभा निवडणूक २०२४ तसेच अकोला महापालिका निवडणूक २०२६ या सगळ्यांमध्ये अपेक्षेप्रमाणे यश मिळवता आले नाही. महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी एक जम्बो कार्यकारिणी घोषित केली. या कार्यकारिणीत उपाध्यक्ष, सरचिटणीस, चिटणीस अशा एकूण ४३ पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. याशिवाय विविध मोर्चा अध्यक्ष, कोषाध्यक्ष यांचाही समावेश आहे. मात्र, यापैकी एकाही स्थानावर अकोल्यातील भाजप नेत्यांना दूर ठेवले गेले. अमरावतीचे प्रवीण पोटे उपाध्यक्ष तर पुन्हा एकदा संजय कुटे यांना प्रदेश सरचिटणीस करत कार्यकारिणीत घेण्यात आले.

येणाऱ्या काळात संघटनेला पोषक असे वातावरण तयार करण्यासाठी तसेच नवीन नेतृत्व तयार करण्यासाठी प्रदेश कार्यकारिणीत स्थान मिळणे आवश्यक असते. परंतु, भारतीय जनता पार्टीच्या स्थानिक नेतृत्वाच्या असफल कामगिरीमुळे कोणालाच हे स्थान मिळाले नाही. निवडणूक कामगिरीत घसरण लोकसभा २०१९ च्या निवडणुकीत भाजपने अडीच लाखांहून अधिक मतांच्या लीडने विजय मिळवला होता. मात्र, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ही लीड केवळ ४०-४५ हजारांवर येऊन थांबली. त्याचबरोबर, विधानसभा निवडणुकीत गेली कित्येक दशके अधिराज्य गाजवणारी अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातही कमजोर उमेदवारामुळे भारतीय जनता पार्टीला पराभवाचा सामना करावा लागला. भाजपचा अकोला पश्चिम मध्ये झालेला दारुण पराभव याचा फटका भाजपाला बसला.

अकोला महापालिकेच्या बाबतीतही परिस्थिती वेगळी नव्हती. २०१७ च्या महापालिका निवडणुकीत एकूण ८० जागांपैकी ४८ जागा जिंकून भाजपने बहुमत साध्य करून सत्ता स्थापन केली होती. माजी केंद्रीय मंत्री संजय भाऊ धोत्रे तसेच स्वर्गीय लालाजी म्हणजेच गोवर्धनजी शर्मा यांच्या नेतृत्वात भाजपची कामगिरी जोरात होती. मात्र, २०२६ च्या महापालिका निवडणुकीत नेतृत्वक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने बहुमत गमावले गेले. इतकेच नाही तर मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत दिलेल्या साठ पारचा नारा पार धुळीस मिळाला आणि गेल्या महापालिका निवडणुकीच्या विजया पेक्षा दहा जागांची घट झाली. मनमानी पध्दतीने तिकिट वाटपाचा आरोप पक्षातील नेत्यांनी केला. माजी नगरसेवकांना घरचा रस्ता दाखविला. त्यांच्यापैकी काहींनी विजय प्राप्त केला. पण, पक्षाची परिस्थिती महापालिका निवडणुकीत चांगलीच बिघडली. त्यामुळे शहरात एमआयएम सारख्या पक्षाशी पडद्यामागे हात मिळवणी करुन सत्ता निर्माण करावी लागली. अकोल्यात भाजप ची नाही तर शहर सुधार आघाडीची सत्ता स्थापन करण्याइतपत ग्राफ घसरला. प्रदेश नेतृत्वाचा निर्णय आणि या सर्व निवडणूक पराभवांचा आणि खराब कामगिरीचा थेट परिणाम म्हणूनच भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश नेतृत्वाने कदाचित अकोल्यातील एकाही नेत्याला प्रदेश कार्यकारिणीत स्थान दिले नाही, असे दिसते.

### महापालिका निवडणुकीच्या तोंडावर गाजला मुद्दा

एम आय एम सोबत अकोट येथे केलेली आघाडी आणि त्यांचा महापालिका निवडणुकीच्या तोंडावर झालेला गौप्यस्फोट हा राज्यात भाजपला धक्का देणारा ठरला. कारवाईच्या संकेतानंतर देखील अकोट येथील शहर कार्यकारणीवर कोण मेहरबान आहे अशी विचारणा आता होत आहे. इतकेच नाही तर अकोल्यात महापालिका सत्ता स्थापन करताना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटासोबत केलेली आघाडी आणि पडद्यामागून एम आय एम नगरसेवकांची घेतलेली साथ हे प्रदेशस्तरावर अकोल्याची पक्षाची घसरलेली स्थितीच अधोरेखित करणारी ठरली. एकूणच अकोल्यातील एकाधिकारी शाहीला पक्षाने सुरुंग लावल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

## लाडक्या बहिणींना अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी सरकारकडून भेट

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी




**मुंबई :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत जानेवारी महिन्याचा हप्ता बँक खात्यात कधी जमा होणार, असा प्रश्न सातत्याने विचारला जात होता. ई-केवायसी पडताळणी सुरू झाल्यापासून अनेक महिलांना हप्त मिळण्यात अडचण येत होती. त्यात ८६ लाख लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या होत्या. अखेर विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारने लाडक्या बहिणींना भेट दिली आहे. योजनेसाठी पात्र असलेल्या महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा केले जात आहेत. सोमवारी अनेक लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा झाले.

ऑक्टोबर २०२५ पासून ई-केवायसीची प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यादरम्यान अनेक महिलांना ई-केवायसी करताना अडचणी आल्या होत्या. सतत तांत्रिक अडचणी येत असल्याने ई-केवायसीची मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. गेल्या वर्षापर्यंत महाराष्ट्रात या योजनेअंतर्गत २.४ कोटींहून अधिक लाभार्थी महिला होत्या. परंतु ई-केवायसीद्वारे पडताळणी सुरू झाल्यानंतर डिसेंबर २०२५ महिन्यात फक्त १.६ कोटी लाभार्थ्यांना शेवटचा हप्ता मिळाला. जानेवारी महिन्याच्या मध्यात हा हप्ता मिळाला होता.

## प्रशासक आणि आयुक्तांचे जाहिरातीचे बॅनर लागल्याने चर्चा

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी




**अकोला:** मालमत्ता करावरील शास्ती अभय योजनेची मागणी निलेश देव यांनी केली. त्यानंतर सत्तारुढ भाजप नेत्यांनी या विषयी आयुक्तांच्या दालनात बैठक घेत मालमत्ता कर वसुलीसाठी शास्ती अभय योजना राबविण्याची सुचना केली, आदेश दिला. पण, ही योजना राबवितांना प्रशासनाने पुन्हा कॉपी पेस्ट करत सत्तारुढ शहर सुधार आघाडीला बासनात गुंडाळल्याची स्थिती अकोल्यात ठिकठिकाणी दिसत आहे.

मोठा गाजावाजा करत महापालिका इलेक्शन झाले. निवडणुक झाल्यानंतर सत्ता स्थापन करण्यासाठी मोठ्या घडामोडी झाल्या. शहर सुधार आघाडीची सत्ता महापालिकेत स्थापन झाली. महापौर, उपमहापौर विराजमान झाल्या. पण, महापालिका प्रशासन गेल्या तीन चार वर्षापासून प्रशासक आणि आयुक्तांच्या राज्य व्यवस्थेत असल्याचे चित्र मात्र कायम आहे. महापालिका शास्ती अभय योजनेचे शहरात लागलेल्या बॅनरवर मात्र अजूनही शहरात प्रशासक राज असून त्याचे प्रमुख आयुक्त असल्याचे चित्र आहे. सत्तारुढ शहर सुधार आघाडीला ते सत्तेत असल्याचे भान नसल्याचे चित्र असून प्रशासनावरचा वचक सत्तारुढ भाजप प्रणित शहर सुधार आघाडीचा नसल्याचे चित्र कायम आहे. शास्ती अभय योजनेचे बॅनरवर प्रशासक आणि आयुक्त हे कायम राहत असेल तर सत्ता स्थापन करण्याची घाई कशाला केल्या गेली. निवडणुका कशाला घेतल्या. लोकशाही प्रक्रिया कशाला राबविली असा प्रश्न या निमित्त उपस्थित होत आहे. बॅनरवर प्रिंटिंग मिस्टेक झाल्याचा दावा महापालिका कर विभाग निश्चित करेल हे बॅनर काढले जातील, नवे लावले जातील. लोकशाही व्यवस्था स्थापन झाल्यानंतर लोकशाहीला प्रशासक राज मध्ये गुंडाळणाऱ्या प्रशासनातील अधिकाऱ्यांनी प्रशासक आणि आयुक्त असे बॅनर लावत लोकशाहीची खिल्ली उडविली नाही तर सत्तारुढ शहर सुधार आघाडीची सत्ता एक प्रकारे नाकारल्याचे चित्र आहे.

## अनिल अंबानींना हायकोर्टाचा दणका!

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**मुंबई :** कथित फसवणूक प्रकरणात रिलायन्सचे अनिल अंबानींना मुंबई उच्च न्यायालयात मोठा झटका बसला. अनिल अंबानी विरोधात सुरू केलेल्या फसवणुकीच्या वर्गीकरणाच्या कारवाईला यापूर्वी एकलपीठाने दिलेला स्थगिती आदेश खंडपीठाने रद्द केला आहे. बँक ऑफ बडोदा, इंडियन ओव्हरसीज बँक आणि आयडीबीआय बँक यांचे अपिल मंजूर केले आहे. रिलायन्स कम्युनिकेशन्सच्या कर्ज खात्यांच्या फसव्या वर्गीकरणाच्या वादावर न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांनी दिलेल्या आदेशाला बँकांनी आव्हान दिले होते. रिलायन्स कम्युनिकेशनचे प्रमुख आणि उद्योगपती अनिल अंबानी यांच्याशी संबंधित हे प्रकरण आहे. रिलायन्स कम्युनिकेशन्सच्या बँक खात्यांना फ्रॉड म्हणून वर्गीकृत करण्याच्या कारवाईला यापूर्वी हायकोर्टाच्या एकलपीठाने अंतरिम स्थगिती दिली होती.

## पार्थ पवार राज्यसभेवर जाणार!

### राष्ट्रवादीच्या कोअर कमिटीच्या बैठकीत निर्णय

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी



**मुंबई :** आगामी राज्यसभा निवडणुकीत पार्थ पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार असतील, असा निर्णय पक्षाकडून घेण्यात आल्याची माहिती आहे. सोमवारी रात्री मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसच्या झालेल्या पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत हा निर्णय झाल्याची माहिती आहे. सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत पार्थ पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. प्रफुल पटेल यांच्या मुंबईतील निवासस्थानी ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह कोअर कमिटीचे सदस्य उपस्थित होते. तसेच २६ फेब्रुवारीला होणाऱ्या राष्ट्रीय अध्यक्ष निवडीसंदर्भात आयोजित केल्या जाणाऱ्या राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक तयारीविषयी या बैठकीत चर्चा झाल्याचे समजते. येत्या काही दिवसांमध्ये वरळी डोम येथे राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक होणार आहे. जिथे सुनेत्रा पवार यांच्या नावावर राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून शिक्कामोर्तब केले जाणार आहे.

## पीएफधारकांना खूशखबर.. बंद पडलेल्या खात्यातील जमा पैसे सरकार देणार!

### थेट खात्यात जमा होणार रक्कम

वृत्तसंस्था २४ फेब्रुवारी

**नवी दिल्ली :** कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या (ईपीएफओ) ७ लाखांहून अधिक निष्क्रिय खात्यांमध्ये ३०.५२ कोटी रुपये अडकले आहेत. जे लवकरच संबंधित खातेदार किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना परत केले जातील. एका अधिकृत सूत्राने सोमवारी ही माहिती दिली. भारत सरकारच्या श्रम आणि रोजगार मंत्रालयाच्या नुकत्याच झालेल्या एका आढावा बैठकीत ७.११ लाख निष्क्रिय खात्यांचा निपटारा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापैकी प्रत्येक खात्यात १००० रुपये किंवा त्यापेक्षा कमी रक्कम शिल्लक आहे. ईपीएफओचे एखादे खाते तेव्हा निष्क्रिय मानले जाते, जेव्हा त्यामध्ये ३६ महिन्यांहून अधिक काळ कर्मचारी किंवा नियोक्त्याकडून कोणतीही रक्कम जमा झालेली नसते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एकूण ३१.८६ लाख निष्क्रिय ईपीएफ खात्यांमध्ये १०,९०३ कोटी रुपये जमा आहेत. यापैकी १००० रुपयांपर्यंत शिल्लक असलेल्या ७ लाख खात्यांमधील ३०.५२ कोटी रुपयांची रक्कम प्राधान्याने परत केली जाईल.

### निष्क्रिय खाती टप्प्याटप्प्याने निकाली काढणार!

मंत्रालय स्तरावर ईपीएफच्या सर्व निष्क्रिय किंवा बंद पडलेल्या खात्यांचा टप्प्याटप्प्याने हे निकाली काढण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, ईपीएफओ 'ईपीएफओ ३.०' या डिजिटल उपक्रमावर देखील काम करत आहे, ज्याअंतर्गत 'कोअर बँकिंग सिस्टिम'वर आधारित सुविधा लागू केल्या जात आहेत. दावे निकाली काढण्याचा कालावधी २० दिवसांवरून कमी करून तो ३ दिवसांपेक्षा कमी करणे आणि सदस्यांच्या सेवा एकात्मिक प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देणे हा याचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय, यूपीआयच्या माध्यमातूनही पीएफ खात्यातून पैसे काढण्याची व्यवस्था केली जात आहे, ज्यामुळे सामान्य नागरिकांना मोठा दिलासा आणि सुविधा मिळणार आहे.

## टीईटी नापास गुरुजींना हायकोर्टाचा झटका!

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**नागपूर :** टीईटी पास नसलेल्या अपात्र शिक्षकांना हायकोर्टात मोठा झटका बसला आहे. शिक्षकांच्या पदोन्नती यादीत नाव समाविष्ट करण्याच्या याचिकांमध्ये टीईटी अर्हता निर्णायक ठरली आहे. टीईटी पात्रता नसलेल्या शिक्षकांना पदोन्नतीसाठी विचार करता येणार नाही, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. त्या अंतरिम आदेशानुसार झालेली पदोन्नतीची कार्यवाहीही न्यायालयाने अवैध ठरवली. मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठाने २० फेब्रुवारीचा अंतरिम आदेश मागे घेतला आहे. टीईटी नसलेल्या शिक्षकांना पदोन्नती नाही असे या निकालाने अधोरेखित झाले आहे.

## पुण्यातील 'द रुट्स स्पा' सेंटरवर छापा!

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**पुणे :** विमानगर परिसरातील 'द रुट्स स्पा' येथे पोलिसांची कारवाई सुरू असताना महिला कर्मचारी आणि स्पा सेंटरच्या व्यवस्थापकाने इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरून उडी मारली. यात महिलेचा मृत्यू झाला असून, व्यवस्थापक गंभीर जखमी झाला.

पोलिसांच्या माहितीनुसार, विमानतळ पोलिस ठाण्याच्या पथकाने रविवारी दुपारी तीनच्या सुमारास स्पा सेंटरवर छापा टाकला. कारवाईदरम्यान अटकेच्या भीतीने महिला आणि व्यवस्थापकाने खिडकीतून उडी मारल्याचे पोलिसांनी सांगितले. उडी मारल्यामुळे महिला गंभीर जखमी झाली होती. तिला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारांपूर्वीच तिचा मृत्यू झाला आणि व्यवस्थापकाला पायाला गंभीर दुखापत झाली. त्याच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी तात्काळ पंचनामा केला. स्पा सेंटरचा कारभार, परवाने, कर्मचारी नोंदी; तसेच अन्य बाबींची तपासणी सुरू केली आहे. स्पा सेंटरमध्ये सुरू असलेल्या प्रकारांबाबत तक्रारी मिळाल्यावर ही कारवाई करण्यात आली होती. घटनेतील मृत महिलेची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. या प्रकरणी विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरू होते.

CLASSIFIED

**तार फेन्सींग**
तार फेन्सींग प्लॉट व शेतीला वाजवी दरात करुन मिळेल.
२० वर्षाचा अनुभव
संपर्क
R.R.Construction
9860828949

**सिध्दार्थ वधू-वर सूचक केंद्र**
मुला-मुलींचे तसेच घटस्फोटीत यांची नाव नोंदणी करण्यात येईल. याची फी ५०० रुपये राहील. (फक्त बौध्द समाजातील मुला-मुलींकरीता)
-:संपर्क:-
सिध्दार्थ दामोधरे अमरावती
मो. 9545000880

**फ्लॅट फ्लॅट फ्लॅट**
नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट
अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट
पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8468872250
8788432278

**प्लॉट प्लॉट प्लॉट**
नवीन लेआउट तपस्या नगरी
फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट
पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती
अधिक माहिती साठी संपर्क
मो. 8263923606
7757905649


CMYK CMYK

सिटी न्यूज अमरावती

मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## अमरावतीत अवतार मेहेर बाबांचा १२३ वा जन्मोत्सव सोहळा उत्साहात; भक्तांसाठी दिवसभर विविध कार्यक्रमांचे आयोजन

**अमरावती :** अवतार मेहेर बाबा अमरावती केंद्र येथे अवतार मेहेर बाबा यांच्या १२३ व्या जन्मोत्सवाच्या पवित्र सोहळ्यासाठी सर्व तयारी पूर्ण झाली असून भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. हा पवित्र सोहळा दिनांक २५ फेब्रुवारी रोजी पहाटे ४.३० ते सायं. ५.०० या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. प्रेम आणि भक्तीने भरलेल्या अंतःकरणाने सर्व बाबा-प्रेमी आणि ईश्वर-शोधकांना या मंगल दिनी उपस्थित राहण्याचे मनःपूर्वक निमंत्रण देण्यात आले आहे. केंद्रावर येऊन या दिव्य उत्सवात सहभागी व्हावे आणि अवतार मेहेर बाबांच्या अनंत प्रेम व आशीर्वादाचा लाभ घ्यावा,



असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

या निमित्ताने स्मरण, प्रार्थना आणि भक्तीभावाने एकत्र येत 'फक्त देवच हा एकमेव खरा आहे' हा संदेश आचरणात आणण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# युवाशक्ती हीच भारताच्या प्रगतीची खरी ओळख - जनरल मनोज पांडे

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अमरावती :** तरुण पिढी ही केवळ देशाचे नागरिक नसून ती भारताच्या परिवर्तनाचा आणि प्रगतीचा एक अविभाज्य भाग आहे. येणा-या काळात विविध क्षेत्रांतील नेतृत्वाची धुरा तुम्हा तरुणांच्या खांद्यावर असेल, युवा शक्ती हीच भारताच्या प्रगतीची खरी ओळख असल्याचे प्रेरणादायी उद्गार भारतीय लष्कराचे माजी प्रमुख जनरल मनोज पांडे यांनी काढले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ४२ वा दीक्षांत समारंभामध्ये प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

व्यासपीठावर समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे तसेच विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. आर.एम. कडू, श्री हर्षवर्धन देशमुख, डॉ. प्रवीण रघुवंशी, डॉ. आर.डी. सिकची, डॉ. व्ही.एच. नागरे, डॉ. व्ही.एम. मेटकर, डॉ. विद्या शर्मा, डॉ. ए.एम. बोर्डे, डॉ. मनिषा कोडापे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, अधिष्ठाता डॉ. अरूण हरणे, डॉ. एच. आर. देशमुख, डॉ. मोना चिमोटे, डॉ. वैशाली गुडधे, कुलसचिव डॉ.

### ♦ विद्यापीठाच्या ४२ वा दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न




अविनाश असनारे, आयक्युएसी संचालक डॉ. संदीप वाघुळे, तंत्रशिक्षण सहसंचालक डॉ. व्ही.आर. मानकर, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. अभय खांबोरकर प्रामुख्याने उपस्थित होते.

जनरल मनोज पांडे यांनी या प्रसंगी पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी 'तीन सी' चा मंत्र दिला. चरित्र, क्षमता आणि आचरण हे यशाचे तीन आधारस्तंभ आहेत. प्रामाणिकपणा, निष्ठा आणि नैतिक धैर्य हे उत्तम माणसाचे लक्षण आहे. विद्यार्थ्यांनो हेच गुण तुम्हाला योग्य मार्ग निवडण्यास मदत करतील. आपल्या कार्यक्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी ज्ञान आणि कौशल्य सतत अद्ययावत ठेवा. आयुष्यभर शिकण्याची वृत्ती जोपासा. शिस्त, सांघिक कार्य आणि सहानुभूती या गुणांमुळे तुम्ही समाजात वेगळी ओळख निर्माण करू शकाल. बदलाचा स्वीकार करा. ते पुढे म्हणाले, प्रगती ही बदलाशी जोडलेली असते. जुन्या विचारसरणीला आव्हान देऊन नवनवीन कल्पनांचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. 'केवळ प्रयत्न करून थांबू नका, तर परिणामांवर आणि सकारात्मक परिणामांवर लक्ष केंद्रित करा,' असा मोलाचा सल्लाही त्यांनी दिला.

आजच्या तांत्रिक युगावर भाष्य करताना ते म्हणाले की, तंत्रज्ञान आपली क्षमता वाढवत असले तरी, भावनिक बुध्दिमत्ता आणि मानवी मूल्ये यांची जागा कोणीही घेऊ शकणार नाही. तंत्रज्ञानाचा वापर करताना माणुसकी विसरू नका. यावेळी जनरल पांडे यांनी विद्यार्थ्यांच्या यशात शिक्षकांच्या आणि प्राध्यापकांच्या असलेल्या भूमिकेचे विशेष कौतुक केले. शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मार्गदर्शक तारे आहेत, जे त्यांना जीवनाच्या प्रवासात योग्य दिशा दाखवतात, असे त्यांनी आवर्जून सांगितले. शेवटी, तुम्ही ज्ञानाचे दूत आणि बदलाचे वाहक म्हणून जगात वावरा. देशाच्या प्रगतीची मशाल तुमच्या हातात आहे, असेही त्यांनी युवकांना सांगितले.

नेहरु कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नेर परसोपंत येथील कु. निकीता किशोर पुनसे या विद्यार्थीनीने ०६ सुवर्ण व १ रोख पारितोषिक, आर.ए. कला, एम.के. वाणिज्य व एस.आर. राठी विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथील कु. पल्लवी बालकृष्ण राठोड या विद्यार्थीनीने ०५ सुवर्ण व रौप्य १ रोख, श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय, शेगांव येथील कु. तेजस्विनी विठ्ठल भगत आणि विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथील कु. साई=ारी सत्यजित इंदुरकर या विद्यार्थीनीने प्रत्येकी ४ सुवर्ण पारितोषिके प्राप्त केली आहेत. दीक्षांत समारंभात या विद्यार्थीनींना मान्यवरांच्या हस्ते पदके व रोख पारितोषिके देवून गौरवान्वित करण्यात आले. दीक्षांत समारंभात ८० टक्के पदके मुलींना, तर २० टक्के पदके मुलांना मिळाली.

**डॉ. कमलताई गवई यांना डिलीट**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या ४२ व्या दीक्षांत समारंभामध्ये डॉ. कमल रामक्रिष्ण गवई यांना मानवविज्ञान विद्याशाखेंतर्गत राज्यशास्त्र विषयात वाङ्मय पंडित (डी.लिट) या सर्वोच्च पदवीने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी त्यांच्या सन्मानार्थ गौरवोद्घोषाचे वाचन करण्यात आले.

या दीक्षांत समारंभात विद्याशाखानिहाय ४६६ संशोधकांना आचार्य पदवी देवून सन्मानित करण्यात आले. पदके प्राप्त करणा-यांमध्ये निकीत टिकैत या दिव्यांग विद्यार्थ्याचा सुध्दा समावेश आहे. या प्रसंगी अधिष्ठात्यांनी पदवीकांक्षी व आचार्य पदवीकांक्षींना सादर केले. यावेळी कुलगुरूंनी विद्यार्थ्यांना अनुग्रह दिला.

कृत्रिम बुध्दिमत्तेशी जुळवून घेत विद्यार्थ्यांनी यशाची शिखरे पादाक्रांत करावीत : कुलगुरू

ठआजचे युग हे 'एआय' अर्थात कृत्रिम बुध्दिमत्तेचे आहे. विद्यार्थ्यांनी या बदलांना घाबरून न जाता नवीन कौशल्ये आत्मसात करावीत. एआय हे रोजगाराची नवीन दालने उघडणारे तंत्रमित्र ठरेल,ठ असे मत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. मिलींद बारहाते यांनी अध्यक्षीय भाषण करतांना व्यक्त केले. विद्यापीठाच्या ४२ व्या दीक्षांत समारंभात अध्यक्षीय भाषण करताना ते बोलत होते. विद्यापीठाशी सध्या ४५१ महाविद्यालये संलग्न असून सुमारे दोन लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यावर्षी ४२,३१७ विद्यार्थ्यांना पदवी व पदविका प्रदान करण्यात आल्या. बदलत्या काळानुसार विद्यापीठाने पदवी स्तरावरील सर्व विद्याशाखांच्या अभ्यासक्रमात 'एआय'चा अनिवार्य घटक म्हणून समावेश करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. विद्यापीठाने संशोधनात मोठी झेप घेतली असून, यावर्षी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी दक्षिण आफ्रिकेचे पेटंट मिळवण्यासह एकूण १२ पेटंट्सवर मोहोर उमटवली आहे. विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू केली असून अभ्यासक्रम अद्ययावत करण्यावर सतत भर दिला जात आहे. 'इंद्रधनुष्य' सारख्या इतरही आंतरविद्यापीठ स्पर्धांमध्ये आणि खेलो इंडिया, सॉफ्ट बॉल स्पर्धा सारख्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या ऐतिहासिक यशाचे कुलगुरूंनी कौतुक केले.

## राजापेठ पोलीसांनी मंदीरातील चोरीचा आरोपी पकडून माल हस्तगत

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अमरावती :** सदर प्रकरणाची हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी पवन रंगराव भेरडे, वय ३६ वर्षे, रा. राजापेठ, अमरावती यांनी दिनांक २३.०२.२६ ला तकार दिली की, फिर्यादी राहत असलेल्या इमारतीच्या पार्कीगमध्ये हनुमानजीचे छोटे मंदीर बांधलेले आहे.

त्या हनुमानजीच्या मुर्तीच्या डोक्यावर चांदीचे मुकुट वजन अंदाजे २५० ग्रॅम कि. अं. ४०,००० रूपयांचे बसवीले होते. दिनांक २३.०२.२०२६ चे १०.३० वा सुमारास फिर्यादीचे पत्नीने फिर्यादीला फोन करून सांगीतले की, हनुमानजीच्या



डोक्यावरील चांदीचे मुकुट दिसत नाही. वरून फिर्यादीने मंदीरामध्ये येवुन पाहले असता त्यांना चांदीचे मुकुट दिसुन आले नाही. ते मुकुट कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशनला अपराध कमांक ११७/२६ कलम ३०५ (अ), भान्यासं अन्वये दाखल करण्यात आला.

सदर प्रकणामध्ये राजापेठ पोलीसांनी अथक प्रयत्न करून मिळालेल्या गुप्त बातमीच्या आधारे आरोपी मंगेश प्रकाश चवरे, वय ३८ वर्षे, रा. मधु किराणा जवळ, बेनोडा, अमरावती हयाला ताब्यात घेवुन विचारपुस केली. त्याने सदर घटनास्थळी चोरी केल्याचे सांगीतले वरून नमुद आरोपीचे ताब्यातुन हनुमानजीच्या मुर्तीच्या डोक्यावर असलेले चांदीचे मुकुट वजन अंदाजे २५० ग्रॅम कि. अं. ४०,००० रूपयांचे व गुन्हा करते वेळी आरोपीने वापरलेली होन्डा कंपनीची स्पेंडर प्लस गाडी कमांक एम एच २७ डि एक्स ७६८० ही कि. अं. १,००,००० असा एकुण १,४०,००० रूचा माल जप्त करण्यात आला.

सदरची कारवाई . राकेश ओला, पोलीस आयुक्त अमरावती शहर, . श्याम घुगे, पोलीस उपायुक्त परि- २ अमरावती, कैलास पुंडकर, सहायक पोलीस आयुक्त, अमरावती, यांचे मार्गदर्शना खाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पुनीत कुलट, पोउपनि मिलींद हिवरे, पोहेका मनीष करपे, पोहेकॉ पंकज खटे, पोहेका रवी लीखीतकर, पोका सागर भजगवरे, पोका अर्जुन कदम, यांनी केली.

## सराईत गुन्हेगार शेख शहबाज उर्फ मुरारी शेख कलीम यास MPDA कायदयान्वये केले स्थानबध्द

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

### ♦ एम पी डी अंतर्गत कारवाई

**अमरावती :** अमरावती शहर येथील कुख्यात गुन्हेगार शेख शहबाज उर्फ मुरारी शेख कलीम वय २५ वर्ष रा. झिब्राईल बाबा दर्गा जवळ, पठाण चौक, अमरावती हा सन २०१८ पासुन गुन्हेगारी कार्यवाहीमध्ये लिप्त आहे. त्याचे विरूध्द पोलीस स्टेशन नागपुरी गेट, खोलापुरी गेट आणि सिटी कोतवाली अमरावती शहर येथे खुन, दुखापत करणे, राहत्या घरात चोरी, रात्रीची घरफोडी, गैर निरोधाबद्दल, अश्लील कृती करणे, शांतता भंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, अवैद्यरित्या अग्णीशस्त्र आणि घातक शस्त्रे बाळगणे, हमला करणे, बलप्रयोग करणे, हद्दपार आदेश आणि अधिसुचनांचे उल्लघंन करणे अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे एकुण ०७ गुन्हे दाखल आहे. त्याचेवर यापुर्वी



प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेले आहे. तसेच त्यास तडीपार सुध्दा करण्यात आले आहे तरी सुध्दा तो गुन्हेगारी क्षेत्रात सक्रीय आहे.

नमुद ईसमाविरूध्द वपोनि . हनमंत उरलागोंडावार, व पोलीस निरीक्षक, श्री. जनार्दन साळुंखे, पोलीस ठाणे नागपुरी गेट, अमरावती शहर. यांनी सपोआ. . कैलास पुंडकर, गाडगेनगर विभाग व पोउपआ परीमंडळ-१ रमेश धुमाळ, यांचे मार्फतीने पाठविलेल्या प्रस्तावाची प्रभारी सपोआ गुन्हे श्रीमती सिमा दाताळकर (प्रशासन), पोलीस निरीक्षक श्री. संदीप चव्हाण, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेतील एम.पी.डी.ए. सेल चे अधिकारी सपोनि . इम्रान नायकवडे, सहा. पोउपनि. अजय मिश्रा, चेतन कराडे तसेच पो.स्टे. नागपुरी गेट येथील नापोकॉ आनंद ठाकुर, मंगेश बोरकर व डी.बि. पथक यांनी पुर्तता केली. सदर प्रस्तावावर मा. पोलीस आयुक्त श्री. राकेश ओला यांनी दिनांक २३/०२/२०२६ रोजी आदेश पारीत केले. पोलीस निरीक्षक, पो.स्टे. नागपुरी गेट मार्फत आदेश तामिल करून त्यास स्थानबध्दतेच्या कालावधी करीता मध्यवर्ती कारागृह अमरावती येथे दिनांक २३/०२/२०२६ ला दाखल करण्यात आले आहे. यापुढेही शहरातील सराईत गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. कायदयाखाली कारवाई करण्यात येणार आहे. आगामी सण उत्सवाच्या पार्श्वभुमीवर अमरावती शहर आयुक्तालय हद्दीतील गुन्हेगारांची माहीती संकलीत करून त्यांचेवर विविध कायदयाअंतर्गत प्रतीबंधात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात अतिक्रमणाबाबत आझाद समाज पार्टीचा आवाज, पोलिसांची त्वरित कारवाई

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अमरावती :** शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात काही व्यक्तींनी अतिक्रमण करून अस्वच्छता निर्माण केली असून तेथे दारू पिणे व भांडणे करण्याचे प्रकार घडत असल्याची तक्रार करण्यात आली. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते.

या पार्श्वभूमीवर आझाद समाज पार्टीचे युवा शहराध्यक्ष नितीन रामभाऊ काळे, शहर मीडिया प्रभारी सिद्धार्थ दामोधरे यांनी पुढाकार घेत



संबंधित प्रकाराविरोधात आवाज उठविला. तसेच भारतीय संविधान पर प्रसार समिती महासंघाचे संस्थापक अध्यक्ष विश्वास मारुती वानखडे यांनी यावेळी मार्गदर्शन केले.

यावेळी ११२ क्रमांकावर फोन करून पोलिसांकडे अधिकृत तक्रार नोंदविण्यात आली. तक्रारीची दखल घेत कोतवाली पोलिस, दामिनी पथक तसेच गाडगेनगर पोलीस स्टेशनचे अधिकारी गौरवनाथ जाधव तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिस्थितीचा आढावा घेत संबंधित व्यक्तींना त्वरित तेथून हटविण्याचे आदेश दिले व परिसर रिकामा करण्यात आला. या कारवाईमुळे चौक परिसरात पुन्हा शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित झाली असून नागरिकांनी पोलिस प्रशासनाचे आभार मानले आहेत. परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यासाठी नियमित पाहणी करण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

## अमरावतीत श्री. संत गाडगेबाबा यांची १५० वी जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अमरावती :** अमरावती येथील श्री संत गाडगेबाबा (म.प.स.) संस्था, कटोरा रोड, अमरावती (र.न. ए.१९६३४) यांच्या वतीने यावर्षीही थोर समाजसुधारक श्री संत गाडगेबाबा यांची १५० वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येत आहे.

हा जयंती महोत्सव सोमवार दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी संस्थेच्या मंदिर सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम सकाळी १० वाजता श्री. गाडगेबाबांची सामूहिक



आरती होईल. त्यानंतर सकाळी ११ वाजता स्वागत समारंभ पार पडणार असून श्री संत गाडगेबाबांवर भजन तसेच इतर सामाजिक भजन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी दुपारी १२ ते २ या वेळेत उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन कार्यकारी विश्वस्त मंडळ, श्री संत गाडगेबाबा (म.प.स.) संस्था, कटोरा रोड, अमरावती यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## डॉ. शुभांगी अरुण जोशी यांना इंग्रजी विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी



**अमरावती :** इंग्रजी विषयातील सखोल अभ्यास, संशोधनाची आवड आणि सातत्यपूर्ण परिश्रम यांच्या जोरावर डॉ. शुभांगी अरुण जोशी यांनी डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (पीएच.डी.) पदवी संपादन करून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविले आहे. त्यांच्या संशोधनाचा विषय प्रख्यात लेखिका व समाजसेविका सुधा मूर्ती यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री व्यक्तिरेखांच्या परिवर्तनाचा अभ्यास हा होता.

डॉ. शुभांगी जोशी यांनी आपल्या प्रबंधामध्ये सुधा मूर्ती यांच्या साहित्यामधील स्त्री पात्रांच्या प्रवासाचे सखोल विश्लेषण केले आहे. सामाजिक बंधने, परंपरा, संघर्ष, आत्मभान आणि सक्षमीकरण या विविध पैलूंमधून स्त्री व्यक्तिरेखा कशा घडत जातात, याचा अभ्यास त्यांनी संशोधनातून मांडला आहे. त्यांच्या या अभ्यासामुळे इंग्रजी साहित्यातील स्त्रीवादी दृष्टिकोनाला नव्या दृष्टीने अधोरेखित करण्यात मदत झाली आहे.

## बीएसआय मिशन २५ कार्यशाळेला यशस्वी करा:विजयकुमार चौरपगार

### ♦ भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकाऱ्यांची सभा उत्साहात



प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अमरावती:** भारतीय बौद्ध महासभा बीएसआय मिशन-२५ हा २५ कलमी कार्यक्रम महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशभरात यशस्वीरित्या राबवित आहे. १४ मार्च रोजी याच संदर्भात कार्यशाळा आयोजित केली आहे. केंद्रीय कार्यालय प्रमुख एस के भंडारे सविस्तर मार्गदर्शन करणार असून कार्यशाळेला यशस्वी करण्याकरिता जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागण्याचे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक विजयकुमार चौरपगार यांनी केले. भारतीय बौद्ध महासभा तर्फे पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण सभा रविवार(ता. २२) रोजी महाबोधी बुद्धविहार, सबनीस प्लॉट येथे जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. मार्गदर्शक म्हणून विजयकुमार चौरपगार उपस्थित होते.तर अतिथी म्हणून महिला आघाडी जिल्हाध्यक्ष माया धांडे, संगीता सरदार, महानगर अध्यक्ष प्रमिला शेंडे, गौतम गजभिये, जिल्हा सरचिटणीस गणपत तिडके धम्मपिठावर विराजमान होते.

## अमरावतीत रंगणार अभिनयाचा महामेळाव !

### ♦ २६ फेब्रुवारीपासून बालनाट्य स्पर्धेची भव्य अंतिम फेरी

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अमरावती :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने सांस्कृतिककार्य संचालनालयामार्फत आयोजित विविध नाट्यस्पर्धापैकी मराठी बाल नाट्यस्पर्धेची अंतिम फेरी यंदा पहिल्यांदाच अमरावती येथे होत आहे. दि. २६ फेब्रुवारी २०२६ पासून छत्रपती श्री. शिवाजी महाराज सभागृह, डॉ. पं.दे. मेडिकल कॉलेज परिसर येथे या स्पर्धेला सुरुवात होणार आहे. अशी माहिती राज्यसभा खासदार अनिल बोंडे व त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

गेल्या जवळपास ६० वर्षांपासून राज्यभरात विविध नाट्यस्पर्धा — मराठी व्यावसायिक, मराठी हौशी, संस्कृत, हिंदी आदी — आयोजित केल्या जातात. काही स्पर्धा



प्राथमिक व अंतिम फेरी अशा स्वरूपात होतात, तर काही एकाच फेरीत पार पडतात. मात्र यावर्षी बाल नाट्यस्पर्धेची अंतिम फेरी अमरावतीत होत असल्याने शहरासाठी ही अभिमानाची बाब ठरली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली ही अंतिम फेरी पार पडणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालक श्री. विभीषण चवरे यांनी दिली. राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, आमदार रवी राणा, आमदार प्रविण तायडे, आमदार राजेश वानखडे, आमदार प्रतापदादा अडसड यांच्या विशेष प्रयत्नांमुळे ही स्पर्धा अमरावतीत आयोजित करण्यात आली आहे.

मागील ५-६ वर्षांपासून अमरावती केंद्रावर बालनाट्य स्पर्धेत विक्रम नोंदवले जात आहेत. गेल्या वर्षी ६० एकांकिका सादर झाल्या होत्या. यावर्षी मात्र ८९ बालनाट्यांच्या सहभागाने नवीन विक्रम प्रस्थापित झाला आहे. स्पर्धा समन्वयक श्री. विशाल फाटे, अमरावती नाट्य परिषदेचे अध्यक्ष ॲड. चंद्रशेखर डोरले, नाट्य परिषद मध्यवर्ती मुंबई चे नियामक मंडळ सदस्य प्रशांतजी देशपांडे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या संयुक्त प्रयत्नातून ही स्पर्धा उच्च स्तरावर आयोजित करण्यात येत आहे.

**निविदा सुचना**

**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, अकोला**

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला हे ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत जि. प. देखभाल दुरुस्ती निधी मौजे कारंजा रमजानपुर ता. बाळापूर जि. अकोला येथील प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची दुरुस्ती करण्याच्या कामाकरीता जिल्हा परिषद/ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील योग्य वर्गात पंजीकृत असलेल्या कंत्राटदाराकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

सदर कामाची ई निविदा प्रसिद्धीची पहिली वेळ प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर निविदा संबंधी माहिती, अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर पाहावयास उपलब्ध आहेत.

**कार्यकारी अभियंता**
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद, अकोला

सिटी न्यूज अकोला

मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# जीडीसी अँड ए. व सी.एच.एम. परिक्षा २०२६ ऑनलाईन अर्ज १० मार्चपर्यंत करता येईल

**अकोला:** सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत डिप्लोमा इन को-ऑपरेशन अँड अकाऊंटन्सी (जीडीसी अॅन्ड ए.) व सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र (सीएचएम) परीक्षा मे- २०२६' बाबत अधिसुचना प्रसिध्द करण्यात आली आहे. परीक्षेतून उत्तीर्णांना नागरी सहकारी बँका, नागरी सहकारी पतसंस्था, कृषि उत्पन बाजार समिती अशा सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांमध्ये पदभरतीसाठी प्राधान्य देण्यात येते. तसेच सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यांना सेवानियमातील तरतुदीनुसार सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्यास वेतनवाढ देण्यात येते. सहकारी संस्थांचे लेखापरीक्षणाकरिता शासनाकडून प्रसिद्ध होणाऱ्या लेखापरीक्षकांचे नामतालिकेवर लेखापरीक्षकांचे नाव समाविष्ट करण्यासाठी सदर परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. सदर परीक्षा दि. २६, २७ व २८ मे रोजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांचेमार्फत घेण्यात येणार आहे.

## महाननगरात पोलिस स्टेशनला बरिकेट्स चे वितरण



**अकोला:** सहकार क्षेत्रासोबतच सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या गोदावरी नागरी सहकारी सोसा.च्या स्थानीक शाखेच्या वतीने पोलीस ठाण्यांना रहदारी व बंदोबस्त च्या दृष्टीकोणातून बॅरिकेट्स वितरित करण्यात आलेत. सोसायटीच्या आठव्या वर्धापनदिन निमित्त हा रचनात्मक सामजिक उपक्रम साकार करण्यात आला. संस्थेचे संस्थापक हेमंत पाटील, अध्यक्षा राजश्री पाटील यांच्या मार्गदर्शनात व व्यवस्थाप कीय संचालक धनंजय तांबेकर, उपमहाव्यव स्थापक सुरेखा दवे, सहायक महाव्यवस्थापक विजय शिर्मेवार तसेच सहायक महाव्यवस्थापक रवि इंगळे उपस्थितीत यांच्या संपन्न या वितरण कार्यक्रमात पोलीस निरीक्षक मनोज बहुरे, नगरसेवक नितीन ताकवाले, अँड विजय भांबेरे आदी उपस्थित होते. मान्यवरांनी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक केले. गोदावरी अर्बन ही केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित न राहता समाज उपयोगी उपक्रमात सातत्याने पुढाकार घेणारी संस्था असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## शेतकरी खातेदारांना कर्जासाठी केवायसी करणे आवश्यक

**अकोला:** जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेमार्फत व दि. अकोला - वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत घेतलेल्या कर्जाबाबत शेतकऱ्यांनी केवायसी करणे आवश्यक आहे.

जे शेतकरी मयत झाले असतील त्यांच्या वारसांनी विविध सेवा सहकारी संस्था व दि. अकोला- वाशिम जिल्हा मध्यवर्ती बँकेत वारसांची नावे देऊन सर्वांनी त्यांचे आधार कार्ड संबंधीत गटसचिव व बँकेचे शाखाधिकारी यांचेकडे जमा करावेत, असे आवाहन सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक डॉ. प्रविण एच लोखंडे यांनी केले आहे.

अकोला तालुक्यातील २५६, अकोटमधील ७८, बार्शिटाकळीतील ३२०, बाळापूरमधील ८१, पातुरमधील १३३, तेल्हारामधील २५३, मुर्तिजापूरमधील ४३७ असे एकूण १ हजार ५५८ खातेदारांचे आधार कार्ड प्रत सोसायट्यांकडे उपलब्ध नाहीत.

# जिल्हा परिषद अधिकारी कर्मचारी व क्रीडा सांस्कृतिक महोत्सवात मुर्तीजापूर पंचायत समितीने पटकावले उपविजेतपद

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**मूर्तिजापूर:** अकोला जिल्हा स्तराधिकारी कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा वसंत देसाई स्टेडियम अकोला येथे दिनांक १२ ते १४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान पार पडला या स्पर्धेमध्ये मैदानी व सांघिक इनडोअर, आउटडोअर सर्व क्रीडा स्पर्धेमध्ये १२४ गुण मिळवून मैदानी क्रीडा स्पर्धांचे तसेच सांस्कृतिक स्पर्धांमध्ये झाकी व लोकगीते विजय होऊन सांस्कृतिक स्पर्धेचे सुद्धा उपचॅम्पियन पद मुर्तीजापुर पंचायत समिती पटकावले मुर्तीजापूरच्या अधिकारी कर्मचारी खेळाडू खालील क्रीडा स्पर्धेमध्ये विजयी राहल्या.

सांघिक खेळ हॉलीबॉल पास पुरुष, हॉलीबॉल महिला, हॉलीबॉल शूटिंग पुरुष, खो-खो पुरुष, खो-खो माहिला यामध्ये अकोला जिल्ह्यातील प्रत्येकी आठ संघामधून प्रथम क्रमांक विजय संपादन केला तर फुटबॉल पुरुष आणि कबड्डी महिला द्वितीय क्रमांक



विजय मिळविला, तसेच बॅडमिंटन डबल पुरुष, टेबल टेनिस पुरुष एकेरी, टेबल टेनिस क्रीडा प्रकारामध्ये विजयी राहिले आणि बॅडमिंटन डबल महिला टेबल टेनिस डबल महिला बॅडमिंटन एकेरी पुरुष ४५ वयोगटातील या क्रीडा प्रकार प्रकारांमध्ये उपविजेयी राहिले मैदानी खेळ मध्ये १००-४ रिले महिला दोनशे मीटर रनिंग, महिला ४०० मीटर रनिंग मध्ये महिला १५०० मीटर रनिंग महिला उपविजयी राहील्या.

सांस्कृतिक स्पर्धा मध्ये झाकी या स्पर्धेचे जिल्ह्यातून प्रथम तसेच लोकगीत प्रकारांमध्ये सुद्धा प्रथम क्रमांक मिळवला, दिव्यांग यांच्या स्पर्धांमध्ये महिला थाळीफेक, पुरुष गोळा फेक, उपविजयी आणि भालाफेक महिला १०० मीटर रनिंग मधील विजयी राहिल्या. मूर्तिजापूर पंचायत समिती, जिल्हा परिषद अधिकारी कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धामध्ये प्रथमताच एवढे मोठे यश संपादन केले आहे. याचे मा. मोरे साहेब गटविकास अधिकारी तथा अध्यक्ष तालुका क्रीडा समिती मुर्तीजापुर यांचे मार्गदर्शन, तसेच मुर्तीजापुर तालुक्यातील सर्व विभाग प्रमुख अधिकारी सांस्कृतिक स्पर्धा समन्वयक गजानन इंगळे आणि गटसमन्वयक व क्रीडा समन्वयक, कैलास सोळंके यांचे क्रीडा विषयक नियोजन, सराव आणि मेहनीतीला जाते , वैशाली रामटेके मॅडम (गटशिक्षणाधिकारी) यांनी कळविले आहे. झाकी प्रथम क्रमांक मिळविण्यात सौ लता सोळंके मॅडम व त्यांच्या सहकारी गोंडचवर सर तसेच कुमारी राऊत मॅडम यांचे परिश्रमाने हीच झाकी बुलढाणा येथे पार पडलेल्या विभागीय स्पर्धांमध्ये सुद्धा सादर करण्यात आली.

सांस्कृतिक स्पर्धांमध्ये मार्गदर्शन महाराष्ट्र संगीत विद्यालयाचे संचालक श्याम कोल्हाडे सर तसेच अक्षय बु.हाने आणि राहुल नाईक सर यांचे संगीत संयोजन योगदान लाभले. तालुक्याच्या संघात किर्तने साहेब वि. अ. मा. डॉक्टर कराळे . सहा. गटविकास अधिकारी काळेसाहेब महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी मा. रायबोर्ड साहेब, जामकर साहेब, सोळंके साहेब, वि.अ. शिक्षण मोरे साहेब, लांडे मॅडम वि. अ शिक्षण, सर्व कर्मचारी संघटनांचे अध्यक्ष व पदाधिकारी, सर्व शिक्षण संघटनाचे अध्यक्ष व अधिकारी सर्व संघटनाचे कोचं, व्यवस्थापक यांचे सहकार्य लाभले.

# निश्चित वेळापत्रकाने रोजगार मेळाव्यांना वाढता प्रतिसाद- प्रफुल्ल शेळके

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अकोला:** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राने प्लेसमेंट ड्राईव्हचे निश्चित वेळापत्रक, त्याची व्यापक प्रसिद्धी व विविध उद्योगांशी सतत संपर्क, सुटसुटीत प्रक्रिया केल्याने जिल्ह्यात रोजगार मेळाव्यांना प्रतिसाद वाढत आहे.

अकोला येथील केंद्रातर्फे दर महिन्याच्या तिस-या बुधवारी रोजगार मेळाव्याचे वेळापत्रक निश्चित केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना निश्चित दिवसाची कल्पना मिळाल्याने त्यांच्याकडून जागांबाबत चौकशी केली जाते, तसेच मेळाव्यात सहभागासाठी आवश्यक तयारी केली



जाते. दिवस निश्चित असल्याने हमखास प्रतिसाद मिळतो. त्याचप्रमाणे, वेळापत्रकामुळे सातत्यही राखले जाते. उमेदवार व नियोक्ता दोहोंनाही या उपक्रमाचा लाभ होत आहे, असे जिल्हा कौशल्य विकास अधिकारी प्रफुल्ल शेळके यांनी सांगितले.

पोर्टलवरील नोंदणीबाबतही सुटसुटीत माहिती उपलब्ध करून दिली जाते. केंद्रातर्फे बुधवारी प्लेसमेंट ड्राईव्ह- पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा झाला. त्यात ५८ उमेदवारांची प्राथमिक निवड झाली. या मेळाव्यात चार नामांकित कंपन्या सहभागी झाल्या होत्या. एकूण ८३ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली. ऑनलाइन २४६ उमेदवारांनी सहभाग नोंदवला. ९६ उमेदवार प्रत्यक्ष उपस्थित होते. त्यापैकी ५८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली.

# रोटरीतर्फे मोफत नेत्र तपासणी शिबिर

वि. प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

## ८०४ रुग्णांची तपासणी, ५१२ जणांना मोफत चष्मे वाटप

**अकोट:** रोटरी चॅरिटेबल ट्रस्ट व रोटरी क्लब ऑफ अकोट यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिर व चष्म्यांचे वाटप करण्यात आले. टाकपुरा येथील मारुती संस्थानच्या सभागृहात आयोजित शिबिरात नगर परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती नयनाताई विशाल इंगोले, डॉ. विशाल इंगोले तसेच नगरसेविका स्नेहल दाभेराव यांच्या पुढाकारातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

२२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत पार पडलेल्या शिबिरात एकूण ८०४ रुग्णांची डोळ्यांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ५१२ गरजू रुग्णांना मोफत चष्म्यांचे वितरण आयोजकांतर्फे करण्यात आले.




परिसरातील सर्व धर्मीय नागरिकांनी शिबिराचा लाभ घेतला.

तपासणीदरम्यान सुमारे १५० रुग्णांमध्ये मोतीबिंदूची लक्षणे आढळून आली असून त्यांना पुढील उपचारासाठी रोटरी चॅरिटेबल ट्रस्टतर्फे चालविण्यात येणाऱ्या रोटरी आय हॉस्पिटल येथे पाचारण करण्यात आले आहे. शिबिरात डॉ. अनिल चेडे व ऑप्टोमेट्रिस्ट ज्ञानेश्वर इखार यांनी आपली मोलाची सेवा दिली. कार्यक्रमाचे उद्घाटन धन्वंतरी पूजनाने करण्यात आले. यावेळी प्रभाकरराव मानकर, नगराध्यक्षा मायाताई धुळे, उपाध्यक्ष प्रथमेश बोरोडे, रोटरी क्लब ऑफ अकोटचे अध्यक्ष रवी पवार, चंचलताई पितांबरवाले यांच्यासह किशोर जुनघरे (पोलीस निरीक्षक, अकोट ग्रामीण), नगरसेवक अमोल पालेकर, मंगेश लोणकर, रवी ठाकूर, बादल अहिर, निलेश नवघरे, इम्रान खान, मनोज चंदन, जितेश बरेठीया आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच रोटरी क्लबचे सचिव डॉ. नावेश मोहता, रवी मुंडगावकर, चंदूभाऊ अग्रवाल, सुरेश व्यवहारे, राजकुमार गांधी, संतोष इस्थापे, शिरीष पोटे, दीपक कतोरे, उद्धव गणगणे, विजुभाई सेदानी, रणजीत खेडकर, सुशील लोणकर, विनोद रेळे, अनुप मुंडगावकर यांच्यासह अनेक सदस्य उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी दिनेश मेनसे, मुकेश कहार, प्रवीण यादव, श्याम धुराटे, पप्पू कैसर, करण सोळंके, भूषण लिल्हारे, प्रतीक लिल्हारे, विपुल शेले, यश बेलोकार, बाबूसिंग खन्नाडे, श्रीपाद धर्माधिकारी, संदीप लोणकर, विशाल चौधरी व इतर युवकांनी सहकार्य केले.

# संत गाडगे बाबाजयंती निमित्त गरजू महिलांना साडी चोळी वितरित

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

## संत गाडगेबाबा सेवा समितीचा उपक्रम

**हिवरखेड:** संत गाडगेबाबा सेवा समित हिवरखेड व जिल्हा दिव्यांग सेल कडुन गाडगेबाबा मंदिर येथे गाडगे बाबा जयंती निमित्त गरजू महिलांना साडी चोळी वाटप करण्यात आले.

नपा उपाध्यक्ष सौ. प्रतीभा विरेद्र येऊल यांच्या अध्यक्षतेखाली व प्रकाश पाटील गावंडे, माजी सरपंच संदीप इंगळे, नगरसेवक किरण सेदाणी, सौ. छाया कौसकार, काशीनाथ अस्वार, मधुकर पोके,



निलेश मानकर, प्रमोद निळे, सागर ऊगले, नंदाताई सवदे, ओम अस्वार, योगेश पोके, पत्रकार अर्जून खिरोडकार ,केशव कोरडे, बाळासाहेब नेरकर उपस्थित होते.

यावेळी संत गाडगेबाबा मूर्तीचे पुजन करून गाडगे महाराजांना मानाचा मूजरा करण्यात आला. त्यांनतर सर्वांच्या उपस्थितीत आरती करण्यात आली. मंदिर परिसरात बाबाचा खराटा चालवुन स्वच्छता केली. गाडगेबाबा स्मशान भूमीत सफाई अभियान राबविले. निराश्रीत रोगी गरजवंत यांना १५० व्या जयंतीला सेवा समितीकडून गरजू महिलांना साडीचोळी वितरीत करण्यात आली.

बाळासाहेब नेरकर हे गाडगेबाबाचा दशसूत्री जागर सेवा समितीतर्फे १९ वर्षा पासुन कार्य पार पाडत असून त्यांचे या कार्याचे गावकरी कौतुक करतात.

# रमजान महिन्यात चिमुकल्याने पूर्ण केला पहिला रोजा

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**आलेगाव:** इस्लाम धर्मातील पवित्र रमजान महिन्याची सुरुवात मोठ्या श्रद्धा आणि उत्साहात झाली असून मुस्लिम बांधवांनी पहिला रोजा भक्तीभावाने पाळला. चंद्रदर्शनानंतर गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून एकमेकांना शुभेच्छा देत रमजानचे स्वागत करण्यात आले.



इस्लाम धर्म हा कलमा, नमाज, जकात, रोजा आणि हज या पाच स्तंभांवर आधारित आहे. या पाच तत्वांना धर्मात विशेष महत्त्व असून त्यांचे पालन करणे प्रत्येक मुस्लिमासाठी आवश्यक मानले जाते. रमजान महिन्यात रोजा ठेवून अल्लाहची इबादत करणे, नमाज अदा करणे, कुरआन पठण करणे तसेच गरजूंची मदत करणे याला विशेष महत्त्व आहे.

आलेगाव येथे लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी पहिला रोजा श्रद्धेने पाळला. विशेष म्हणजे कामरान खान इमरान खान (वय १२ वर्षे) याने १३ तास ३२ मिनिटे अन्न-पाणी न घेता पहिला रोजा पूर्ण केला. त्याच्या जिद्दीचे सर्वत्र कौतुक करण्यात येत असून गावातील ज्येष्ठांनी त्याला आशीर्वाद देत अभिनंदन केले. रमजान महिन्यामुळे सध्या आलेगावमध्ये छान वातावरण असून सर्वत्र इबादत, नमाज आणि सामाजिक ऐक्याचे सुंदर चित्र पाहायला मिळत आहे.

# एकलव्य छात्रावासात डॉ. मते यांचा पुण्यस्मरण कार्यक्रम

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अकोट:** स्थानिक एकलव्य छात्रावासात श्रद्धांजली कार्यक्रम पार पडला. छात्रावासातील विद्यार्थ्यांसोबत कुटुंबीयांनी व मान्यवरांनी एकत्र येत डॉ. मते यांना अभिवादन केले. कार्यक्रमाची सुरुवात स्व. डॉ. मते यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.



उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या कार्याची आठवण होताच अनेकांच्या डोळ्यांत अश्रू दाटून आले. स्व. डॉ. मधुकर मते यांनी ३५ वर्षे लक्ष्मी मॅटर्निटी अँड सर्जिकल हॉस्पिटलच्या माध्यमातून हजारो रुग्णांची निस्वार्य सेवा केली. गरीब, गरजू आणि वंचित घटकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचविण्यासाठी आयुष्य वाहिले, वैद्यकीय सेवे बरोबरच सामाजिक कार्यातही त्यांचा मोठा सहभाग होता. या प्रसंगी प्रमुख वक्त्यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले को, 'डॉ. मते हे केवळ एक कुशल वैद्यकीय तज्ज्ञ नव्हते, तर समाजमन जिंकणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी रुग्णसेवेला ईश्वरसेवा मानले आणि शेवटपर्यंत त्या तत्त्वाशी प्रामाणिक राहिले.'मार्गदर्शन, त्यांची शिस्त, रुग्णांविषयीची करुणा आणि सेवाभाव आम्हाला आयुष्यभर प्रेरणा देत राहतील.

कार्यक्रमास लताताई चिकटे, डॉ. मनीषा मते, प्रा. डॉ.अनिल बाभुळकर, बाहेकर, डॉ. अमोल राजगुरू, डॉ. ऋजुता रावगुरू आणि प्रफुल्ल मते यांची उपस्थिती लाभली. सर्वांनी स्व, डॉ. मते यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला, कार्यक्रमाच्या शेवटी छात्रावासातील मुलांना फराळाचे वाटप करण्यात आले.

# खंडणी, ब्लॅकमेलिंग व बनावट बातम्यांद्वारे दहशत; तोतया 'पत्रकार' कोण?

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

## स्वयंघोषित पत्रकारावर तडीपारीची कारवाई केव्हा?

**अकोट:** अकोट शहर व तालुक्यात पत्रकारितेच्या नावाखाली खंडणी उकळणे, ब्लॅकमेलिंग करणे व खोट्या-बनावट बातम्या प्रसिद्ध करण्याची धमकी देऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका स्वयंघोषित 'पत्रकारा'विरोधात संतापाची लाट उसळली आहे. संबंधित व्यक्तीस तीन जिल्ह्यांतून एक वर्षासाठी तडीपार करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

संबंधित व्यक्ती स्वतःला नामांकित संपादक व पत्रकार म्हणून सादर करीत विविध वृत्तवाहिन्या व दैनिकांच्या नावाचा गैरवापर करत असल्याचा आरोप आहे. ङ्घपैसे दिले नाहीत तर बातमी टाकतो,ङ्ग अशा शब्दांत धमक्या देत डॉक्टर, शासकीय अधिकारी-कर्मचारी, बिल्डर, नगरसेवक, ठेकेदार तसेच सामान्य नागरिकांकडून खंडणी उकळण्याचा प्रकार सुरू असल्याचे समोर आले आहे. खोट्या व बदनामीकारक बातम्यांच्या माध्यमातून ब्लॅकमेल केल्याच्या

**नोंद असलेले गुन्हे (नागरिकांचा दावा)**

२०१९ - कलम ४०५, ४२०, ४६४, ४६८, ४७१, ३४ (Case No. २०३००००००२२०१९)

२०१८- कलम १५८(३) (CrPC)

पो. स्टे. रामनगर (वर्धा) - CR No.७३/२०२०, कलम ४२०, ४६८, ५४ LPC

पो. स्टे. आंबड (जालना) - CR No. ६४/२०२०, कलम ४२०, ४६७, ४८८, ४०१, ३४ २०१६ - Negotiable Instrument Act, कलम १३८

पो. स्टे. टारदेव - CR No. २४५/२०१८, कलम ४२०, ४०६, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ४७२, ४७३, ३४ IPC

पो. स्टे. अकोट - CR No. ४७२/२०२३, कलम ३५४, ३५४-अ, ५०६ IPC

टारदेव, बृहन्मुंबई - CR No. ४७९/२०१७, कलम ४२०, ४०६, ३४ IPC

फ्रेझरपुरा, अमरावती — CR No ११७७/२०१८, कलम ४२०, ३४ IPC

पो. स्टे. अकोट (दि. २६/०४/२०२५) ?- CR No ११५(२), ११८(१), ११८(२), अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९, कलम 3(1)(r), 3(1)(s), 3(2)(va) संबंधित प्रकरणी पोलिस प्रशासनाने तातडीने भूमिका स्पष्ट करून ठोस कारवाई करावी, अशी एकमुखी मागणी अकोट तालुक्यातून पुढे येत आहे.

अनेक तक्रारी विविध पोलीस ठाण्यांत नोंद झाल्याची माहिती आहे.

याशिवाय खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकी देणे, बनावट अपंग प्रमाणपत्र तयार करणे, सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून बनावट जॉइनिंग लेटर देणे, पैसे उकळणे, अवैध व्यवसाय करणाऱ्यांना संरक्षण देणे, जमीन व फ्लॅट खरेदी व्यवहारात धनादेश देऊन तो बाऊन्स होणे व उलट संबंधितांवरच खोट्या तक्रारी दाखल करणे, शेतजमिनीच्या फेरफाराचा प्रयत्न करणे अशा गंभीर आरोपांची मालिका त्याच्यावर असल्याचे नागरिक सांगतात.


विशेष म्हणजे, संबंधित व्यक्तीवर राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये अनेक गुन्हे दाखल असल्याचा दावा नागरिकांनी केला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर गुन्हे दाखल असतानाही तो मोकाट कसा, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. ङ्घपोलीस व न्यायालय मला काही करू शकत नाहीत,ङ्ग अशा स्वरूपाच्या बढाया मारत तो नागरिकांना दहशतीखाली ठेवतो, तसेच स्वतःवरील गुन्हे मागे घेण्यासाठी दबाव टाकतो, अशी तक्रारही पुढे आली आहे.

या पार्श्वभूमीवर पोलिसांनी संबंधित सर्व गुन्ह्यांचा तपशील एकत्रित करून प्रतिबंधात्मक कारवाईअंतर्गत तडीपारीचा प्रस्ताव वरिष्ठ स्तरावर तातडीने पाठवावा, अशी मागणी होत आहे. तडीपारीचा आदेश निर्गमित झाल्यास अकोट परिसरात दिलास्याचे वातावरण निर्माण होईल, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे. ङ्घपत्रकारितेच्या पवित्र क्षेत्राला बदनाम करणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. अशा कारवाईमुळे परिसरात शांतता व सुरक्षितता अबाधित राहील,ङ्ग अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली.

# गजानन महाराज विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अकोला :** शहरातील श्री राजे शिव छत्रपती मंडळ च्या वतीने जय गजानन चौक शास्त्रीनगर अकोला येथे विदर्भाची पंढरी शेगांवचे संत श्री गजानन महाराज यांच्या १४८ व्या प्रगट दिनानिमित्त सामूहिक विजय ग्रंथ पारायण चे श्री निलेश महाराज कपले यांच्या अमृततुल्य वाणीतून आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्वप्रथम सकाळी ११:३० वाजता प्रमुख यजमान सुनील खरोटे सहपरिवारच्या उपस्थिती रुद्राभिषेक संपन्न झाले. पारायणाचे पठणा करिता शहरातील विविध भागातील श्री भक्तांनी पारायणाकरिता आपली उपस्थित होते. दुपारी २:३० ते ३ वाजेपर्यंत फराळ निमित्य विश्राम झाले. पारायणाची समाप्तीवेळी सायंकाळी ६ वाजता जय गजानन चौकातील श्री संत गजानन महाराज यांच्या



प्रतिमेचे श्री निलेश कपले सहपत्नि यांच्या हस्ते रुद्राभिषेक पूजन व महाआरती संपन्न झाली. त्यानंतर महाप्रसाद कार्यक्रम संपन्न झाला ज्याचा लाभ शेकडो भाविकांनी घेतला. आगामी २०२८ मध्ये संपन्न होणाऱ्या संत गजानन महाराजांच्या १५० व्या प्रकट दिना निमित्त १५० कोटी ॐ गजाननाय नमः सामूहीक नामजपाचा संकल्प घेण्यात आले. शहरातील इतिहासात कोणत्यात संस्था व मंदिर तर्फे असा कार्यक्रम न झाले न ही घेण्यात आले. या नामस्मरण चा शहरातील श्री भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे व सरकार्य कराव के आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# अवकाळी पावसाचा तडाखा; 534 हेक्टर रब्बी पिकांचे नुकसान

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**यवतमाळ :** जिल्ह्यात 22 आणि 23 फेब्रुवारी 2026 रोजी अचानक आलेल्या अवकाळी पाउस पडला. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे.

प्राथमिक अहवालानुसार, गहू, हरभरा आणि इतर रब्बी पिकांचे एकूण ५३४ हेक्टर नुकसान झाले आहे.

राळेगाव तालुक्यात वीज कोसळून

## झरगड येथे वीज कोसळून पाच जण जखमी

५ जण जखमी झाले असून त्यात ३ महिला आणि २ पुरुषांचा समावेश आहे. जखमींना उपचारासाठी यवतमाळ शासकीय रुग्णालयात दाखल केले गेले आहे.

राळेगाव तालुक्यात झरगड गावातील चंद्रभान पचारे यांच्या शेतात वीज कोसळल्याने चंद्रभान पचारे, वंदना पदिले, सुनीता राऊत, विमल पदिले आणि गणेश नान्हे हे जखमी झाले आहेत. या घटनेनंतर स्थानिकांनी तत्काळ मदतकार्य करून सर्व जखमींना रुग्णालयात दाखल केले.

महागाव व उमरखेड तालुक्यांमध्ये सुद्धा गहू, हरभरा व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी पुन्हा आर्थिक संकटात सापडले आहेत.

जिल्ह्यातील नुकसानाचा प्राथमिक अहवाल तयार होत असून, महसूल विभागाने पंचनामे करून पुढील तपासणीनंतर शेतकऱ्यांना तातडीने मदत जाहीर केली जाईल, असे जिल्हा प्रशासनाने सांगितले आहे.

केळापूर १५ हेक्टर, उमरखेड ६५ हेक्टर, दिग्रस २५० हेक्टर आणि मारेगाव २०४ हेक्टर रब्बी पिकांचे नुकसान झाले असून, हे नुकसान शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर मोठा परिणाम करणार आहे.

# पैनगंगा अभयारण्यत निसर्गाच्या अवकृपेने वरून राजाचे अतोनात नुकसान

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

अवकाळी पावसामुळे ७५ टक्के पिकांचे नुकसान



**उमरखेड :** पैनगंगा वन्यजीव अभयारण्य अंतर्गत येणाऱ्या जंगलभागात रविवारी रात्री अवकाळी पाऊस व जोरदार वादळी वाऱ्याने मोठा तडाखा दिला. घमापुर, कुरळी, नारळी, अमडापूर, टाकळी (बंदी), चिखली (वन), भवानी, वालतूर, कोरटा, दराटी (बंदी) आदी गावांमध्ये शेती पिकांचे प्रचंड व अतोनात नुकसान झाले असुन प्राथमिक अंदाजानुसार गहू, हरभरा, ज्वारी, मका तसेच इतर हंगामी पिकांचे सुमारे ७५ टक्के नुकसान झाल्याचे आजमितीला शेतकऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

वादळामुळे अनेक ठिकाणी पिके आडवी पडली असून काही ठिकाणी काढणीस तयार असलेला गहू आणि हरभरा पूर्णपणे जमिनीवर कोसळुन तोंडी आलेला घास वरूण राज्याने हिराऊन घेतल्याने अचानक झालेल्या पावसामुळे शेतात पाणी साचले असून उभ्या पिकांची गुणवत्ता घसरली आहे. बंदी भागातील नागरिक व शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

शेती हाच मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत असल्याने या नुकसानीमुळे कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर परिणाम होणार असुन शासनाने तातडीने पंचनामे करून वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करावे आणि शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई जाहीर करावी, अशी जोरदार मागणी तेथील शेतकरी वर्गात होत आहे.

दरम्यान, कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

झालेल्या अवकाळी पावसामुळे मका व गहू, हरबरा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# महागाव तालुक्यात अवकाळी पाऊस; रब्बी हंगामातील पिकांचे नुकसान

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी





**महागाव :** महागाव तालुक्याला रविवारी रात्री व सोमवार सायंकाळी निसर्गाच्या जोरदार कोपाने धक्का दिला. विजांच्या कडकडाटासह वादळी वारा व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या हंगल्यावर प्रचंड परिणाम केला. रब्बी हंगामातील पिकांना मोठा फटका बसला असून, शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर काळजीचे छायाचित्र दिसत आहे.

वादळी पावसामुळे शेतात उभा असलेला गहू जमिनीदोस्त पडला असून, काही ठिकाणी पिकांवर पाणी साचल्यामुळे दाणे काळे पडण्याची भीती आहे. काढणीला आलेला हरभरा पावसात भिजल्यामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. सोंगणीसाठी कापलेले तुर पिकांचे नुकसान झाले असून, वादळी वाऱ्यामुळे संत्रा, पपई, केळी आणि लिंबू यासारख्या फळबागा देखील प्रभावित झाल्या आहेत. काही ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती.

शेतकरी वर्गाने निसर्गाच्या या अचानक आलेल्या प्रचंड धक्क्यामुळे आर्थिक संकटाची तक्रार केली आहे. संपूर्ण वर्षभर काबाडकष्ट करून उभे केलेले पिके आता काढणीस तयार असताना अचानक पावसामुळे नुकसान झाल्याने शेतकरी वर्ग पूर्णपणे हवालदिल झाला आहे. अनेकांनी आपल्या हातात तोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती व्यक्त केली आहे.

शेतकऱ्यांनी महसूल व कृषी विभागाकडे तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे करून नुकसान भरपाई जाहीर करण्याची मागणी केली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, या नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक परिस्थिती गंभीर झाली असून त्वरित मदत न मिळाल्यास उदरनिर्वाहावर परिणाम होऊ शकतो. तालुक्यातील शेतकरी वर्गाची ही आर्त हाक शासनाने ऐकून तातडीने योग्य पावले उचलणे आवश्यक आहे.

# भरधाव ट्रॅक्टर पलटी; १ ठार, ३ जखमी

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी



**घाटंजी :** तालुक्यातील साखरा (खु.) येथील पुलाजवळ आज सकाळी सुमारे ८ वाजता भरधाव ट्रॅक्टर ट्रॉलीसह पलटी होऊन भीषण अपघात घडला. या घटनेत ट्रॅक्टरखाली दबून किसन सीताराम मेश्राम (वय अंदाजे ५०) यांचा जागीच मृत्यू झाला, तर निलेश ढोले, बंडू जाधव आणि पिंटू मेश्राम हे तिघेजण जखमी झाले.

एमएच-29 बीसी-6686 क्रमांकाचा ट्रॅक्टर मजुरांना घेऊन शेतातून तुरीचा कुटार आणण्यासाठी जात होता. साखरा बसस्थानकाजवळ चालक नाश्त्यासाठी गाडी थांबवली होती. गाडीला चावी लावलेली असताना एका मजुराने ट्रॅक्टरला सेल्फ सुरू केले. अनुभवाअभावी ट्रॅक्टरवरील नियंत्रण सुटले आणि गावाजवळील छोट्या रप्ट्यावरून ट्रॅक्टर ट्रॉलीसह पलटी झाला.

जखमींना प्राथमिक उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय घाटंजी येथे दाखल केले गेले, त्यानंतर पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलीस स्टेशन घाटंजीचे पथक घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आला.

या प्रकरणाचा सखोल तपास पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शर्मा करत आहेत. प्रशासनाने अपघाताबाबत सुरक्षा नियमांचे पालन करण्याचे आणि वाहनांवर योग्य देखभाल ठेवण्याचे आवाहन केले आहे.

# राहुल सोयाम यांची आर्णी विधानसभा प्रभारीपदी नियुक्ती

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी




**आर्णी :** भारतीय जनता पक्षात संघटनात्मक कामकाजाला गती देण्यासाठी आणि प्रत्येक समाजाला स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी राहुल सोयाम यांची 80आर्णी विधानसभा प्रभारी तसेच आदिवासी आघाडी जिल्हा सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती भाजपा जिल्हा कार्यालय, यवतमाळ येथे जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आली, जिथे त्यांना अधिक जबाबदारी आणि मार्गदर्शन देणारे नियुक्तीपत्र सुपूर्द करण्यात आले.


जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले की, प्रत्येक आघाडीने पक्षाच्या उमेदवारांना निवडून आणण्यासाठी विशेष कामगिरी बजावावी आणि आदिवासी आघाडीने यवतमाळ जिल्ह्यात जोमाने काम करावे. राहुल सोयाम यांनी या संधीसाठी जिल्हाध्यक्षांसह माजी मंत्री मदनभाऊ येरावार, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर, आर्णी विधानसभा लोकप्रिय आमदार राजुभाऊ तोडसाम यांचे आभार मानले.

त्यांनी त्यांच्या मार्गदर्शक, वरिष्ठ पदाधिकारी आणि सहकाऱ्यांचे सहकार्य आणि पाठिंबा असल्याबद्दल विशेष आभार व्यक्त केले. राहुल सोयाम यांचे म्हणणे आहे की, भारतीय जनता पक्ष जागतिक स्तरावर पहिला क्रमांकाचा पक्ष म्हणून उभा राहिला आहे आणि त्यांचा संघटनात्मक प्रयत्न पक्षाच्या वर्चस्व आणि कार्यक्षमतेसाठी महत्त्वपूर्ण ठरेल.

या नियुक्तीमुळे आर्णी विधानसभा आणि यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी आघाडीचे कामकाज अधिक संघटित व जोमाने चालवता येईल, असा विश्वास आहे.

# गॅस गळतीमुळे घराला आग; २० लाखांचे साहित्य भस्मसात






प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**यवतमाळ :** बोरीसिंह येथील श्रीधर मधुकर मायकलवार यांच्या राहत्या घरात गॅस सिलिंडरमधून गळती झाल्याने लागलेल्या आगीत संपूर्ण घर जळून खाक झाले. ही घटना २३ फेब्रुवारी रोजी घडली. आगीत सोन्याचे दागिने, रोख रक्कम, धान्य, कपडे तसेच घरातील इतर साहित्य असा सुमारे २० लाख रुपयांचा ऐवज नष्ट झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

माहितीनुसार, घरातील सिलिंडरमधून गॅस गळती होत असताना अचानक आग भडकली. काही क्षणांतच आगीने भीषण स्वरूप धारण केले. कुटुंबीयांनी प्रसंगावधान राखत घराबाहेर पडल्याने जीवितहानी टळली; मात्र घरातील सर्व साहित्य जळून गेले.

घटनेनंतर पोलीस पाटील राहुल गुंठे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून तो महसूल प्रशासनाकडे पाठविण्यात आला आहे. नुकसानग्रस्त कुटुंबाला तातडीची मदत देण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

## सात वर्षीय सैय्यद इनशालने ठेवलं पहिलं रोजा

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**पुसद :** पुसद शहरातील गढी वॉर्डमध्ये पवित्र रमजान महिन्याची सुरुवात भक्तीभावाने झाली. सैय्यद कफील यांचा सात वर्षीय मुलगा सैय्यद इनशाल हिने आपला जीवनातील पहिला रोजा उत्साहाने व श्रद्धेने पूर्ण केला.



रमजान महिन्यात मुस्लिम समाज उपवास, नमाज पठण, कुराण वाचन, दानधर्म आणि गरजुंना मदत या धार्मिक कर्तव्यांचे पालन करतो. सैय्यद इनशालने कुटुंबासोबत नमाज अदा करत आपल्या पहिल्या रोज्याचा उत्सव साजरा केला. तिच्या या चिकाटी आणि भक्तीने परिसरातील लोकांचे कौतुक कमावले आहे.

# अमरावती विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत यवतमाळ अव्वल

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी



**यवतमाळ :** यवतमाळ जिल्हा क्रीडा संकुल येथे तीन दिवस चाललेल्या अमरावती विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धांमध्ये यवतमाळ जिल्ह्याने पहिल्या क्रमांकाचे बक्षिस पटकावले, तर सर्वसाधारण क्रीडा स्पर्धेत अमरावती जिल्ह्याला आणि सांस्कृतिक स्पर्धेत विभागीय आयुक्त कार्यालयास दुसऱ्या क्रमांकाचे बक्षिस मिळाले. बक्षिस वितरण विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्या हस्ते करण्यात आले.

बक्षिस वितरण सोहळ्यात जिल्हाधिकारी विकास मीना, विभागीय अपर आयुक्त संजय जाधव, विरेंद्र हजारे, अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, महसूल कर्मचारी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष दिलीप कोलेवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी या सोहळ्यात अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दाखवलेला उत्साह व आनंद कौतुकास्पद असल्याचे म्हटले. त्यांनी सांगितले की, खेळाडूवृत्तीने काम करण्याची वृत्ती कायम राखावी आणि सहभागी झाले नसलेल्या कर्मचाऱ्यांनाही प्रोत्साहित करावे. जिल्हाधिकारी विकास मीना यांनी मैदानावर जिंकण्यासाठी लागणारी शिस्त, टीम वर्क आणि नेतृत्व गुण प्रशासनात आणण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

या स्पर्धेत विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि वाशिम जिल्ह्यांमधील चमू सहभागी झाले. क्रीडा स्पर्धेत यवतमाळाने २८५ गुण मिळवून अव्वल स्थान मिळवले, तर सांस्कृतिक स्पर्धेत २६४.५ गुणांसह यवतमाळ प्रथम स्थानी राहिला. कबड्डी, क्रिकेट, वॉलीबॉल, फुटबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, खो-खो तसेच नृत्य, अभिनय, गीतगायन व नाटक या स्पर्धांमधील विजेत्यांचा सन्मान करण्यात आला.

अंतिम सोहळा राष्ट्रगीताने संपन्न झाला, ज्यात तहसिलदार योगेश देशमुख यांनी आभार प्रदर्शन केले.

## सहा वर्षांच्या अजफरीन फातेमा हिने ठेवला पहिला रोजा

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**उमरखेड :** पवित्र रमजान महिन्याची सुरुवात उमरखेडमध्ये एक अद्वितीय घटनेने झाली आहे. मोहम्मद



अरिफोद्दीन यांची सहा वर्षीय मुलगी अजफरीन फातेमा हिने आपल्या जीवनातील पहिला रोजा श्रद्धेने व उत्साहाने पूर्ण केला. तिच्या या धाडस आणि भक्तीने परिसरात आश्चर्य आणि कौतुकाची लहर निर्माण केली आहे. रमजान महिना मुस्लिम समाजासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असून, या काळात उपवास, नमाज, कुराण वाचन, दानधर्म यासारख्या धार्मिक कर्तव्यांचा आदर केला जातो. अजफरीन फातेमा हिने आपला पहिला रोजा कुटुंबासोबत साजरा करत नमाज अदा केली.


# 31 वर्षांनंतर फेब्रुवारीत रमजानचा शुभारंभ

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**योगेश मडावी**

**झरी जामणी :** अल्लाहच्या इबादतीचा पवित्र महिना रमजान यंदा 19 फेब्रुवारीपासून सुरू झाला, आणि गुरुवारी पहिला रोजा ठेवण्यात आला. 18 फेब्रुवारी रोजी चंद्रदर्शन झाल्यानंतर तरावीह नमाजची सुरुवात झाली. स्थानिक मौलाना यांनी अधिकृत चंद्रदर्शनाची घोषणा करत रमजानच्या आगमनाची माहिती दिली. तब्बल 31 वर्षांनंतर हा पवित्र महिना फेब्रुवारीत आला आहे, ज्यामुळे रोजेदारांसाठी सहरी आणि इफ्तारच्या कालावधीमध्ये थोडी सोय होईल.

इस्लामी कालगणनेनुसार, रमजान दरवर्षी सुमारे 10–11 दिवस आधी येतो. त्यामुळे यंदा रोजा फेब्रुवारीत सुरू झाल्याने कालावधी तुलनेने कमी आहे. रमजान हा रहमत, मगफिरत आणि निजाताचा महिना मानला जातो. या महिन्यात प्रत्येक बालिग मुस्लिमाला 29 किंवा 30 रोजे उपास्य राहणे फर्ज आहे. धार्मिक विद्वानांच्या मते, रमजानमध्ये केलेल्या प्रत्येक नेक कामाला अनेक



पटींनी सवाब मिळतो; सामान्य नेक कामाला दहा पट तर फर्ज अमलाला सत्तर पट सवाब दिला जातो.इतिहास पाहता, 1993 मध्ये 23 फेब्रुवारी, 1994 मध्ये 12 फेब्रुवारी आणि 1995 मध्ये 1 फेब्रुवारीला रमजान सुरू झाला होता. त्यानंतर 31 वर्षांनंतर पुन्हा फेब्रुवारीत रमजान आला आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, 2030 मध्ये एका सौर वर्षात दोनदा रमजान येण्याची शक्यता आहे; तसेच 2063 सालीही हीच परिस्थिती होईल.

रमजानच्या पवित्र महिन्यामुळे मुस्लिम समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून मशिदींमध्ये विशेष नमाज, कुरआन पठण आणि दानधर्माचे कार्यक्रम सुरू झाले आहेत. लोकांनी उपास्याचा पूर्ण लाभ घेऊन धार्मिक आणि सामाजिक कर्तव्य पार पाडण्यावर भर दिला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# महापौरांचे फेरीवाले व अनधिकृत बांधकामावर कारवाईचे निर्देश

## ♦ महापौर खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अकोला :** शहर 'अतिक्रमण मुक्त' करण्याच्या संकल्पनेअंतर्गत सोमवारी महापौर शारदा रणजित खेडकर यांच्या दालनात आढावा बैठक पार पडली. या बैठकीस महापालिकेचे आयुक्त डॉ. सुनील लहाने, माजी महापौर विजय अग्रवाल, उपमहापौर अमोल गोगे, सभागृहनेते पवन महल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत महापौर खेडकर यांनी, अतिक्रमण हटविल्यानंतर त्याच ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही, यासाठी विशेष दक्षता



घेण्याचे निर्देश दिले आहे.

झोननिहाय अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी प्राधान्याने निकाली काढाव्यात, रस्त्यावर बांधकाम साहित्य आढळल्यास तत्काळ कारवाई करून रस्ते मोकळे ठेवावेत, अशा सूचनाही देण्यात आल्या. यावेळी सहायक आयुक्त विठ्ठल देवकते, देविदास निकाळजे, राजेश सरप, गजानन घोंगे, सहायक अतिक्रमण निर्मूलन अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, विधि अधिकारी श्याम ठाकूर, तसेच कनिष्ठ अभियंते अक्षय बोर्डे, नरेश कोपेकर, आदी उपस्थित होते.

### अनधिकृत बांधकामांवर कारवाईचे निर्देश

◆ शहरातील वाढत्या अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. प्रत्येक कनिष्ठ अभियंत्याने आपल्या कार्यक्षेत्रात दररोज स्थळ निरीक्षण करावे आणि अनधिकृत बांधकाम आढळल्यास तत्काळ नियमानुसार कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. तसेच अतिक्रमण य अनधिकृत बांधकामांविरोधातील कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी झोननिहाय तयार करण्यात आलेल्या पथकांमध्ये पुरेशा संख्येने कर्मचारी उपलब्ध करून देण्याचे, तसेच आवश्यक साहित्य व साधनसामग्रीची तातडीने खरेदी करण्याचे आदेशही प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

# तेल्हाऱ्यात नगराध्यक्षांसह मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात जागरण गोंधळ आंदोलन !

## ♦ शहरातील समस्यांचा वाचला पाढा; प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**तेल्हारा :** शहरात अनेक समस्यांनी तोंड वर काढले असून, शहराला भकास अवस्था प्राप्त झाली आहे. सार्वजनिक शौचालयाची दुरवस्था, सौंदर्यीकरणाचा अभाव, अशा अनेक समस्यांनी शहरवासी वैतागले आहेत. याकडे तालुका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी चक्क तेल्हारा नगर परिषदेचे नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या दालनात जागरण, गोंधळ आंदोलन करण्यात आले.

या अनोख्या आंदोलनात आंदोलनकर्त्यांनी विविध मागण्यांचे निवेदन मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांना दिले. यामध्ये तेल्हारा शहरातील मुख्य मार्केट परिसरात मुत्रीघर उभारणे, ज्या घरकुलधारकांना १० वर्ष पूर्ण झाले



त्यांच्या असिसमेंट वरील लाभार्थी स्टॅम्प काढणे, शहरातील गुंठेवारी नियमित करणे व आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावणे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा नियोजित जागेवर उभारणे, इंदिरा नगर आवासातील झोपडपट्टी धारकांना घरकुल लाभ देणे, प्रभाग क्र.४ मधील अभ्यासिकेला अत्याधुनिक करणे व विविध समस्यांचे निराकरण करणे, पांढरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करणे, स्व. रामसिंहभाऊ बलोदे उद्यान ची दुरुस्ती करणे, योगेश्वर कॉलनी येथील साचलेल्या पाण्याची विल्हेवाट लावणे, गौतमा नदी परिसर स्वच्छ करणे, दिव्यांग बांधवांना त्याचा हक्काचे शासन निर्णय नुसार ५टक्के निधी वितरित करणे व सोयी सुविधा पुरवणे, प्रभाग क्रमांक ६ मधील गार्डन ला हिंदुसूर्य महाराणा प्रताप उद्यान नाव देणे, टॉवर ते शेगाव नाका परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे वैकुंठ धाम चे सुशोभिकरण करणे, अशा विविध मागण्या व समस्या निकाली काढण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली.

# लिनेस क्लब ऑफ अकोलाचा अनुकरणीय उपक्रम

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अकोला :** मलकापूर स्थित सूर्योदय बालगृहात लिनेस क्लब ऑफ अकोला कडून आवश्यक साहित्य आणि पौष्टिकक खाद्य पदार्थांचे वितरण करण्यात आले. मुलींसाठी सॅनिटरी नॅपकिन्स, मोठे नॅपकिन्स, मुलांना चिवडा, बोर्नविटा, लाडू, कोल्ड मिल्क, ओआरएस पाऊचेस वितरित करण्यात आली.

२५ मुलांना लिनेस पीडीपी हरविंदर कौर सेठी यांच्याकडून साहित्य उपलब्ध करून देण्यात आले होते. या मुलांच्या देखभालीसाठी त्यांचे आई-वडील, नातेवाईक पुढे येत नाहीत. कारण ती



एचआयव्ही बाधित आहेत. परंतु अठरा वर्षापासून सूर्योदय बालगृहाचे व्यवस्थापन त्यांचे पालन पोषण करीत आहे. त्यांना सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. शैक्षणिक सांस्कृतिक जडणघडण केली जात आहे. जेणेकरून ही मुले स्वतःच्या पायावर उभी राहून उज्वल भविष्य घडवू शकतील. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्लबच्या अध्यक्ष राजश्री समनपुरे जयस्वाल, पीडीपी लिनेस सुनंदाजी, प्रांताध्यक्ष लिनेस कल्पनाताई देशमुख, लिनेस सुलेखाजी गुप्ता, लिनेस प्रेमाजी मुंदडा यांचा सहभाग होता.

# डॉ.भाग्यश्री चौधरी यांना आचार्य पदवी बहाल




**अकोट :** अकोट तालुक्यातील मंचनपुर सावरा गावांमधील रहीवासी संतोष चौधरी यांची कन्या डॉ भाग्यश्री हीला नुकतेच संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती येथे कुलगुरू यांच्या हस्ते प्राणीशास्त्रात आचार्य पदवी बहाल करण्यात आली.. डॉ भाग्यश्री चे डीग्री पर्यतंचे शिक्षण अकोट येथील शिवाजी महाविद्यालय येथे झाले. तिला मिळालेल्या यशाचे सर्व स्तरांमधून कौतुक होत आहे.तर शिवाजी महाविद्यालय अकोट येथेही तीचा मान्यवरांचे उपस्थीतीत सत्कार करण्यात आला भाग्यश्री ची डिग्री म्हणजे चौधरी परिवाराचा अभिमान आहे तिच्या यशाचे गावकऱ्यांनीही कौतुक केले.

### जेईई मेन 2026 सत्र- 1 मध्ये आकाश इन्स्टिट्यूटच्या हजारावर विद्यार्थ्यांना 99 पेक्षा जास्त परसेंटाईल

# महाराष्ट्रातील 54 विद्यार्थ्यांना 99 परसेंटाईलपेक्षा जास्त गुण

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अकोला :** वैद्यकीय आणि आयआयटी-जेईईच्या तयारीसाठी प्रसिद्ध असलेल्या आकाश इन्स्टिट्यूटने पुन्हा एकदा घवघवीत यश संपादन केले आहे. अकोला शाखेतील अनेक विद्यार्थ्यांनी या परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. आकाश इन्स्टिट्यूट विश्वासाचे नाव ठरले आहे.

आकाश इन्स्टिट्यूटचा लौकिक वाढवणा-या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये मोहम्मद शोएब ९९.३४ परसेंटाईल, राघवेंद्र देशमुख ९९.३२ परसेंटाईल, अनय राठी ९९.२४ परसेंटाईल, पार्थ राठोड



९९.०७ परसेंटाईल. याव्यतिरिक्त विशाल गावंडे, संदेश खडगे, तन्मय मलानी, तन्मय हनवंटे, अनुज धागे, किशोर सावंग, यश राठोड आणि करण धनागरे यांनीही परीक्षेत शानदार यश मिळवले आहे. संस्थेच्या या यशाबद्दल विद्यार्थी आणि पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मेहनत, योग्य मार्गदर्शन आणि योग्य दिशा मिळाल्यास यश नक्कीच मिळते, हे आकाश अकोला शाखेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. जेईईच्या तयारीसाठी आकाश यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

# अकोला प्रीमियर लीग 2026 पं. शंकरप्रसाद अग्निहोत्री चॅम्पियन्स ट्रॉफी

## स्कूल ऑफ स्कॉलर्स अकोलाचे आयोजन

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अकोला :** शहरातील हिंगणा रोडवरील डी.एस.ओ. मैदानावर स्कूल ऑफ स्कॉलर्स अग्निहोत्री ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या वतीने आयोजित अकोला प्रीमियर लीग २०२६ – पं. शंकरप्रसादजी अग्निहोत्री चॅम्पियन्स ट्रॉफी' या कॉर्पोरेट क्रिकेट स्पर्धेचा भव्य समारोप मोठ्या उत्साहात पार पडला. विविध शासकीय व निमशासकीय विभागांच्या १६ संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. १३ फेब्रुवारी रोजी स्पर्धेचे उद्घाटन पोलिस ट्रेनिंग सेंटर अकोलाचे एसपी निलेश पांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. स्पर्धेचा अंतिम सामना चॅरिटी सुपर किंग्स अॅडव्होकेट टीम आणि



अकोला महानगरपालिका संघ यांच्यात झाला. रोमांचक सामन्यात चॅरिटी सुपर किंग्स संघ विजेता ठरला, तर अकोला महानगरपालिका संघ उपविजेता ठरला. अंतिम सामन्याला उपमहापौर अमोल गोगे आणि पीआय मनोज केदारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विजेत्या व उपविजेत्या संघांचा सत्कार करून खेळाडूंना प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाच्या वेळी प्राचार्या सौ. मनीषा उंबरकार, प्रशासकीय अधिकारी डॉ. सुमित सुनील बोकाडे, उपप्राचार्या कोमल लहाऱ्या, नैना मुलक, भारती पाटकर, मनप्रीत जनेजा तसेच मान्यवरांची उपस्थिती लाभली. अकोला प्रीमियर लीग ही केवळ क्रिकेट स्पर्धा नसून पं. शंकरप्रसादजी अग्निहोत्री यांच्या प्रेरणादायी कार्याचा गौरव करणारा सामाजिक उपक्रम आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या स्पर्धेचा उद्देश कार्यरत व्यावसायिकांना तणावमुक्तीचा मंच उपलब्ध करून देणे, शारीरिक व मानसिक आरोग्याला चालना देणे आणि विविध विभागांमध्ये एकात्मता वाढविणे हा होता. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सुमित बोकाडे यांनी पुढाकार घेत महत्त्वाची भूमिका बजावली. क्रीडा विभागप्रमुख राजेंद्र डोंगरे, रामेश्वर राठोड, विजय महाले, परेश घाटोडे, मंदार सोनवणे, राहुल सिंह, प्रशांत गजबिये, विक्रम सिंह तसेच स्कूल ऑफ स्कॉलर्सचे सर्व क्रीडा व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी केला. काम आणि जीवनातील संतुलन, सामाजिक सलोखा आणि क्रीडा संस्कृतीचा प्रसार करण्याचा संदेश देणारी ही अकोला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धा शहरासाठी प्रेरणादायी ठरली.

# आरडीजी पब्लिक स्कूल मध्ये ग्रँड पॅरेंटस डे उत्साहाने साजरा

## ♦ पूर्व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांच्या आजी आजोबांसाठी विशेष कार्यक्रम

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अकोला :** येथील आर.डी.जी. पब्लिक स्कूल मध्ये ग्रँड पेरेंट्स डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. २१ फेब्रुवारी रोजी शाळेच्या सभागृहात पूर्व प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांच्या आजी-आजोबांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध स्पर्धा, सांस्कृतिक सादरीकरणे आणि सन्मान सोहळ्यामुळे वातावरण आनंदमय झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात आजी-आजोबांच्या स्वागताने झाली. यावेळी बुक बॅलन्स, बलून बॅलन्स आणि म्युझिकल चेअर अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांमध्ये आजी-आजोबांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. बलून बॅलन्स स्पर्धेत मिस्टर अँड मिसेस शर्मा यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर मिस्टर अँड मिसेस मिरचीला यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. बुक बॅलन्स स्पर्धेत मिस्टर अँड मिसेस चव्हाण यांनी प्रथम क्रमांक मिळविला, तर मिस्टर अँड मिसेस टेकम यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. म्युझिकल चेअर



स्पर्धेत रामा अग्रवाल यांनी प्रथम क्रमांक मिळविला, तर दानवी सरदार यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. पूर्व प्राथमिकच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांचे मन जिंकले. तसेच काही विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून आजी-आजोबांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेली नाटिका विशेष आकर्षण ठरली. कार्यक्रमातआजी-आजोबांसाठी खास सेल्फी पॉईंटची व्यवस्था करण्यात आली होती.स्पर्धेतील विजेत्यांना उपप्राचार्या श्वेता चोमवाल यांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यावेळी त्यांनी 'आपकी झुर्रियों में छुपी कहानियां' ही कविता सादर करून आजी-आजोबांच्या संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले.या सुंदर उपक्रमाबद्दल आजी-आजोबांनी आनंद व्यक्त करत शाळेच्या प्रयत्नांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिक्षिका रूपाली देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिक्षिका पूनम सुकळे यांनी मानले. ग्रँड पेरेंट्स डे निमित्त आयोजित हा कार्यक्रम केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता कुटुंबातील नातेसंबंध अधिक दृढ करणारा आणि आजी-आजोबांच्या संस्कारांचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरला.

# मराठा सेवा मंडळ अकोला तर्फे छत्रपती शिवाजीराजे जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अकोला :** छत्रपती शिवाजी महाराजांनी जन कल्याणकारी स्वराज्याची स्थापना केली. त्यांची प्रशासन व्यवस्था, स्त्री सन्मानाची नीती, आणि लोककेंद्रीत दृष्टी आजही आदर्श मानली जाते. अशा या रयतेच्या राजाने स्त्रियांना मातेचा सन्मान दिला त्या छत्रपती शिवरायांचा आम्हाला अभिमान आहे अशा शब्दात शिवछत्रपतींची महिमा उपमहापौर अमोल गोगे यांनी विशद केली अकोला शहरातील अन्नपूर्णा माता मंदिरासमोरील मराठा समाज भवन येथे आयोजित छत्रपती शिवाजीराजे शहाजीराजे भोसले जन्मोत्सव सोहळा समारंभात ते बोलत होते.

मराठा सेवा मंडळ अकोला तर्फे आयोजित या कार्यक्रमात नगरसेवक श्री अनिल भाऊ गरड, महापालिकेचे गटनेता श्री पवन महल्ले, सहाय्यक पोलीस निरीक्षक






श्री विजय प्रकाश चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री प्रदीप जोगदंड, शिवसेना जिल्हाप्रमुख अश्विन नवले, उद्योजक श्री मनोज चव्हाण, महापालिकेचे सहाय्यक आयुक्त श्री देविदास निकाळजे, उद्योजक श्री नागोरावजी लाटे आदी मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे आयोजन मराठा सेवा मंडळाचे अध्यक्ष श्री मुरलीधर सटाले, उपाध्यक्ष पंडित चौधरी सर गणेश गिराम, प्रदीप लुगडे, मारुतीराव भगत, सुनील चव्हाण तसेच मराठा सेवा मंडळाच्या आयोजक समितीतर्फे करण्यात आले होते.

## ♦ कार्यक्रमाला हजारो समाज बांधवांची उपस्थिती



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अतिथींच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करण्यात आला. वर्षातील ३६५ दिवसांपैकी केवळ एक दिवस आपल्या महाराजांच्या जयंतीसाठी द्या असे आवाहन मराठा सेवा मंडळ तर्फे करण्यात आले होते त्यामुळे या जयंतीला मराठा समाज बांधवांची मोठी गर्दी जमली होती. मराठा सेवा मंडळाच्या स्थापनेला यंदा ४५ वर्षे पूर्ण होत आहेत मंडळाने अन्नपूर्णा माता मंदिरासमोर भव्य ९६ कुळी मराठा समाजासाठी मंगल कार्यालयाचे निर्माण केले आहे या मंगल कार्यालयाचे बांधकाम शेवटच्या टप्प्यात सुरू असून काही दिवसातच सर्व सोयीसुविधांनी हे मंगल कार्यालय समाज बांधवांसाठी अल्प दरात उपलब्ध करून दिले जाईल अशी माहिती यावेळी मंडळाचे अध्यक्ष मुरली दादा सटाले यांनी दिली. याप्रसंगी नगरसेवक अनिल गरड महापालिकेचे प्रशासकीय अधिकारी अनिल बिडवे नगरसेवक पवन महल्ले आदींनी उपस्थित समाज बांधवांना संबोधित केले. कार्यक्रमात समाजातील लहान मुले व मुलींनी शिवरायांच्या जयंतीनिमित्त तसेच त्यांच्या जीवनावर आधारित एकापेक्षा एक सुंदर सांस्कृतिक कार्यक्रम प्रस्तुत करीत उपस्थित सर्वांचीच वाहवाही लुटली. कार्यक्रमाचे संचालन अध्यक्ष मुरलीधर सटाले यांनी केले तर आभार प्रदर्शन पंडित चौधरी सर यांनी केले. मराठा सेवा मंडळ महिला कार्यकारिणीच्या माधुरी बिडवे, श्रीमती दुर्गा पवार, सौ शोभा चौधरी, सौ शारदा सटाले, सौ मंगला जाधव, सौ प्रिया चव्हाण, सौ मनीषा शिंदे महिला कार्यकारणीच्या सदस्यांनी सुद्धा कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अथक प्रयत्न केले. कार्यक्रमाला उपस्थित शेकडो समाज बांधवांसाठी स्नेहभोज कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या सर्वांग सुंदर कार्यक्रमाची उपस्थित सर्वांनीच प्रशंसा केली पुढच्या वर्षी यापेक्षा भव्य दिव्य रूपात छत्रपतींची जयंती साजरी केली जाईल असे आश्वासन याप्रसंगी मराठा सेवा मंडळ तर्फे देण्यात आले

# अडगांव बु येथे ८ मार्चला 'विराट हिंदू संमेलन

## ♦ प्रेरणाताई भोसले यांची तोफ धडाडणार

प्रतिनिधी २४ फेब्रुवारी

**अडगांव :** सकल हिंदू समाजाच्या जनजागृती उद्देशाने तेल्हारा तालुक्यातील अडगांव बु येथे येत्या ८ मार्च रोजी सकल हिंदू समाजाच्या वतीने भव्य 'विराट हिंदू संमेलनाचे' आयोजन करण्यात आले आहे.



या संमेलनाचे मुख्य आकर्षण म्हणजे महाराष्ट्रातील प्रसिद्ध शिवव्याख्यात्या ह.भ.प. प्रेरणाताई भोसले यांचे ओजस्वी व्याख्यान आपल्या रोखठोक आणि प्रेरणादायी शैलीत ऐकण्यास मिळणार आहे.

सोबतच कार्यक्रमाला महेंद्र कवीश्वर ( अकोला विभाग अभिलेखागार संयोजक रा.स्व.सेवक संघ अकोला ), महंत कृष्णानंद भारती महाराज (वारी हनुमान) यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात दुपारी ३ वाजता अडगांव बु गावातून निघणाऱ्या भव्य रॅलीने होईल. ही रॅली गावातील मुख्य मार्गावरून फिरून हिंदू ऐक्याचा संदेश देईल. त्यानंतर सायंकाळी ५.३० वा. स्थानिक जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विस्तीर्ण प्रांगणात मुख्य संमेलनाला दिमाखात सुरुवात होईल. तरी सकल हिन्दु समाजाने हिन्दु संमेलनाला सहपरीवार उपस्थितीत राहावे, असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK